# माणूस
साप्ताहिक

१४ जून १९६९ । किंमत ४० पैसे

दक्षिणायन
मुक्काम श्रीनगर
बिहार वार्तापत्रे
'माणूस'ने खास प्रतिनिधी पाठवून मराठी वाचकांना आजवर सादर केलेल्या या श्रेष्ठ कृतींचे स्मरण देणारी नवी विचारप्रवर्तक लेखमाला

**बंगाली युवकमनाचे खरे अधिपती कोण ?**
**रवींद्र सरोवरातील लाटांनी काय पाहिले ?**
**कलकत्ता महानगराचे झगमगते**
**निशाजीवन खरोखरच वेगळे आहे काय ?**
**नक्षलवादी चळवळीचे आव्हान कोणते ?**
**बंगालमध्ये साम्यवाद येऊ शकेल काय ?**
**'वंग-नक्षलवाद' हा नवीन संप्रदाय आहे तरी कसा ?**
**पश्चिम बंगालचे तोंड पूर्वेकडे आहे काय ?**

**असे काही ज्वलंत प्रश्न ही लेखमाला उपस्थित करीत आहे.**

**दिनांक २८ जून 'माणूस' अंकापासून क्रमशः प्रकाशन**

१४ जून १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे : अंक : दुसरा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे  वार्षिक वर्गणी : वीस रुपये  परदेशची वर्गणी : चाळीस रुपये


आपला ३१ मे चा अंक वाचला 'ग्यानवा' अगदी उत्तम ! 'निर्लिंग बोध' सर्वात उत्तम. राम फाटक यांच्या 'कुबड्या'चे कौतुक करावे तेवढे थोडेच ! 'झुंड' वाचल्यानंतर लेखक 'मीच खरा' असे सांगतो की काय असा भास होतो.

**जून, २** हसमुख एन. शहा, पनवेल.

'झुंड' हे निवेदन अतिशय आवडले. राजकीय नेतृत्वाच्या निष्काळजीपणावर व चुकीच्या निर्णयावर श्री. दळवी यांनी भरपूर प्रकाशझोत टाकला आहे. पण ही एकच बाजू असावी असे वाटते. जितक्या निर्भिडपणे व स्पष्टपणे राजकीय नेतृत्वाचे दोष दळवी यांनी दाखविले आहेत, तितक्याच मोकळेपणाने ते लष्करी अधिकाऱ्यांचे दोषही दाखवितील काय ? लष्करी अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष कृतीचा भाग पुढेच आहे म्हणूनच हा विचार मनात येतो.

**जून, ३ वसंत बोदवडकर, परळी वैजनाथ**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# मुंबई समाचार

सु. ल. सोमण

## प्रबळ पर्यायी पक्ष

जनसंघ, स्वतंत्र व भारतीय क्रांतिदल ह्या उजव्यांच्या (?) एकत्रीकरणातून नवा, लोकशाहीवादी पक्ष उभा करण्याचा प्रयत्न तूर्त तरी फसलेला आहे. दोन्ही कम्युनिस्टांचे मतभेद मिटवून पुनश्च एकत्रित व्हायच्या प्रयत्नांचीही वाटचाल ह्याच दिशेने चालू आहे, तर समाजवाद्यांनाही आपली 'एकी' साधून नवा, लोकशाही-समाजवादी पक्ष स्थापण्याचा प्रयोग रद्द करावा लागला आहे. ह्या साऱ्याचा मथितार्थ एवढाच की, काँग्रेसला पर्यायी असा समर्थ विरोधी पक्ष तूर्त तरी नजीकच्या भविष्यात शक्य दिसत नाही. म्हणजेच, चालू राजकारणाचा प्रवाह ह्याच दिशेने वाहत राहिला तर, १९७२ च्या निवडणुकात आघाड्यांच्या राजकारणालाच रंग चढणार !

काँग्रेसची सत्ता आता डळमळीत झाली आहे. तिचे वरिष्ठ नेते, कितीही उच्चरवाने काहीही सांगोत, निर्वेध सत्ता उपभोगण्याचे दिवस आता संपलेले आहेत हे निश्चित ! काँग्रेसला पर्याय म्हणून देशातल्या निम्म्या राज्यांतून जनतेनं "संयुक्त आघाड्यां"ना निवडून दिलं. आघाड्यांमधल्या विभिन्न पक्षांचे मतभेद इतके तीव्र स्वरूपाचे होते, की ही आघाडी सरकारं कुठल्याही तऱ्हेने काँग्रेसपेक्षा वरच्या दर्जाचं प्रशासन जनतेला देऊ शकली नाहीत. आघाड्यांची ही अनिश्चितता, काँग्रेसची ढिली पकड ह्यामुळेच, समविचारांच्या पक्षांनी एकत्रित येऊन नवीन प्रबळ पक्षांची निर्मिती करावी व त्याद्वारे ही अनिश्चिततेची कोंडी फोडावी ही कल्पना पुढे आली, त्यातूनच हे वर उल्लेखलेले प्रयत्न झाले. हे सगळेच प्रयत्न आज तरी फसलेले आहेत. ह्या प्रयत्नांनंतर अनिश्चितता कायम आहे हे खरोखरच देशाचं राजकीय

दुर्दैवच म्हटलं पाहिजे.

दोन भारतीय कम्युनिस्ट पक्षांच्या मूलभूत विचारसरणीतला फरक, हा त्यांच्या दोन विभिन्न जन्मदात्या राष्ट्रांच्या विचारसरणीतल्या फरकावर अवलंबून आहे. ह्या दोन राष्ट्रात जर उद्या काही चमत्कार घडून एकवाक्यता निर्माण झाली, तर साऱ्या 'तात्त्विक मतां'चं जडजंबाळ बाजूला सारून डांगे–नंबुद्रिपाद–गोपालन् आणि अगदी नक्षलवादीसुद्धा मांडीला मांडी लावून बसतील, ह्याबद्दल मला तरी शंका नाही ! पण त्यापेक्षा, ह्यांनी परराष्ट्रांची भाटगिरी करण्याचं सोडून दिलं, युगोस्लाव्ह कम्युनिस्टांप्रमाणे निखळ राष्ट्रवाद मानला तर, ह्यांचा 'कम्युनिझम' देखील भारताला खूप काही देऊ शकेल. कम्युनिस्ट चीन आज जगातलं पहिल्या प्रतीचं राष्ट्र म्हणून उभं राहू शकलं आहे ते माओने प्रखर राष्ट्रवाद पुरस्कारला म्हणून ! कम्युनिस्ट रशियाची निव्वळ भाटगिरी स्वीकारली नाही म्हणूनच ! !

समाजवाद्यांमध्ये खरोखरच तात्त्विक मतभेद काय आहेत हे समजणं कठीण आहे. आणि म्हणूनच काही मामुली तपशीलाच्या गोष्टींवरचे मतभेद मिटवणं त्यांना जड जाऊ नये असंच वाटत होतं. परंतु ते घडत नाही तेव्हा केवळ एवढंच मनात येतं की काही बड्यांचा वैयक्तिक प्रतिष्ठेचा बनलेला असा हा प्रश्न आहे. त्यांच्यातली लाथाळी, काँग्रेस, कम्युनिस्ट, संघ आदी त्यांच्यापेक्षा मातब्बर पक्षांमध्ये असलेली त्यांची बरीचशी तत्त्वं ह्यामुळे, एके काळी काँग्रेसला पर्यायी म्हणून बाहेर पडलेल्या समाजवाद्यांची शक्ती आज अगदी क्षीण झालेली आहे— एस्. एम्., नाथ पै, गोरे, लिमये, फर्नांडिस, द्विवेदि, आदींसारखे कर्तबगार चेहरे ह्या समाजवाद्यांमध्ये असूनसुद्धा !

जनसंघ, स्वतंत्र व भाक्रांद ह्यांच्या एकीकरणाचा विषय अलीकडे बराच गाजला. काँग्रेस व त्याचबरोबर कम्युनिस्टांच्या विरोधात प्रबळ असा 'उजवा' लोकशाही पक्ष उभा राहील असा आशावाद व्यक्तविला. त्याचबरोबर, अकाली, द्रमुक, गणतंत्र वगैरेंसारखे अनेक प्रांतिक पक्षही ह्या नवीन पक्षात विलीन होऊन देशव्यापी. अत्यंत प्रबळ 'उजवा' पक्ष तयार होईल असही भाकीत अनेकांनी वर्तवलं होतं. पण सगळेच मुसळ केरात ! सुरवातीसच ह्या वाटाघाटींना तडे गेले, आणि आता तर तो प्रश्नच निकालात निघाल्यासारखा झाला आहे. मूलतः ह्या तीन पक्षांच्या विचारसरणीत साम्य असं फारसं नाही. 'स्वतंत्र' हाच एक खऱ्या अर्थानं 'उजवा' पक्ष आहे. 'जनसंघा'चं ध्येयधोरण, घोषणा, एक 'हिंदुत्वा'चा पुरस्कार सोडल्यास काँग्रेस, समाजवादी ह्यांच्यापेक्षा फारसं भिन्न नाही. संमिश्र अर्थव्यवस्था त्याला अभिप्रेत आहे. काही मर्यादेपर्यंत राष्ट्रीयीकरण त्याला मान्य आहे, नव्हे आवश्यक वाटतं. नियोजनाचं सांप्रत स्वरूप संघाला मान्य नसलं (तसं ते समाजवाद्यांनाही मान्य नाही.) तरी नियोजनाला सुटी द्यावी असं तो म्हणत नाही. औद्योगिक क्षेत्रात खाजगी मालकीला, भांडवलशाहीला त्याचा विरोध आहे. त्याची जागा कामगारांच्या

मालकीनं घ्यावी (त्यांना व्यवस्थापनात स्थान मिळून किंवा व्यवसाय प्रत्यक्षत: त्यांच्या मालकीचा होऊन) असं तो प्रतिपादतो. मग असा हा पक्ष ' उजवा ' कसा आणि का तेच मला समजत नाही ! ' भाक्रांद ' ह्या तिसऱ्या पक्षाला तत्त्वाचा निश्चित आधार आहे हेच कुणी मानणार नाही. काँग्रेसमधनं तिकीटं न मिळाल्या-मुळे किंवा खुर्ची न मिळाल्यामुळे फुटून निघालेल्या, सत्तेला हपापलेल्या, असंतुष्टांचा मेळावा म्हणजे ' भाक्रांद '. त्यात उजवे म्हणवून घेणारे ' चरणसिंग ' आहेत. ' भाक्रांदा 'त सामील होऊ घातलेल्या बंगला काँग्रेसचे ' अजयबाबू ' आहेत ! आणि त्याच ' बंगला काँग्रेस 'च्या तिकिटावर ' मिदनापूर 'हून आलेले मेनन आहेत ! ' भाक्रांद 'ही काँग्रेसचीच, पण काँग्रेसहूनही भ्रष्ट नक्कल आहे ! म्हणूनच ह्या तीन पक्षांची एकी जमली नाही, जमणं शक्यही नव्हतं, आणि जमूही नये ! कारण, तशी एकी झालीच, तर त्या नव्या पक्षात आणि काँग्रेसमध्ये फरकच उरणार नाही !


एकीचं राजकारण हे असं फसलं आहे. आर्थिक धोरणाबाबत कोण कुठे बसतो हे मी वर थोडेसे सांगितले. गेल्या काही वर्षातले काश्मीर, कच्छ, चीन, पाकिस्तान, रशिया, अमेरिका वगैरे प्रश्नांवरची विभिन्न राजकीय पक्षांची मतप्रणाली पाहि-ल्यास कोण कुणाच्या अधिक जवळ येऊ शकतो, हे कळून येईल. ह्या दृष्टीने काही मतभेदांवर तात्पुरते पडदे टाकून लोकशाहीवादी, राष्ट्रवादी, मध्यम विचारसर-णीच्या पक्षांनी एकत्रित येऊन काही दिवस काम करून पाहावे. त्यातून नवा पक्ष निर्माण होण्याची– न होण्याची क्रिया काळावर सोपवावी असे मला वाटते. एकदा प्रखर राष्ट्रवाद मानला की, बाकीचे मतभेद भट्टीत वितळून जातील ! जनसंघ, प्रसोपा, संसोपा, आदींनी ह्याचा विचार करायची वेळ आज आली आहे !

## पुन्हा एकदा लडाख !

१९६२ च्या चिनी झुंडीच्या वेळी ' लडाख ' वेळोवेळी वृत्तपत्रांतून गाजत होता. १९६५ ला तो पुन्हा गाजला नि आज पुन्हा एकदा अगदी वेगळ्या कारणांनी गाजतो आहे. निमित्त अगदी साधं झालं. एका लडाखी बौद्ध तरुणीचा विवाह लडाखी मुस्लीम तरुणाशी झाला होता. त्या तरुणीचा पिता निवर्तल्यावर, तिथल्या चालीरीतींनुसार काही संपत्ती ह्या तरुणीला मिळाली; काही तिच्या भावाला मिळाली. भाऊ अर्थातच ' बौद्ध ' आहे. तरुणीला मिळालेल्या वाट्यात राहते. घरही होते. एके दिवशी भावाला भावना आवरता आल्या नाहीत आणि त्याने बहीण राहत असलेल्या घरावर बौद्ध निशाण लावलं. पण दुसऱ्या दिवशी सकाळी ते निशाण नाहीसे झालेलं ! झाले, दोन्ही जमातीत भांडणांना सुरुवात झाली. आज ह्या जातीय तंट्यांनी लडाख धुमसतो आहे. जम्मू–काश्मीरमधून वेगळे काढून लडाखचे

स्वतंत्र केंद्रशासित राज्य प्रस्थापित करावे, तिबेट निर्वासित बौद्धांचे 'लडाख' मध्येच पुनर्वसन करावे. मुस्लिमांतर्फे होणाऱ्या बौद्धांच्या 'प्रार्थना ध्वजा'च्या अपमानाची चौकशी व्हावी, बौद्धांना नोकऱ्यात, शासनात योग्य प्रतिनिधित्व मिळावे, बोधी भाषेला मान्यता मिळावी, वगैरे मागण्यांवर तिथल्या बौद्धांनी आपले आंदोलन उभारले आहे. संप, मोर्चे वगैरे चालू आहेत. मुसलमान समाज अर्थातच, विरोधात आहे. सिमेवरल्या प्रदेशात चालू असलेली ही जातीय तेढ, लवकरात लवकर मिटणे, राष्ट्रीय महत्त्वाची बाब मानली गेली पाहिजे. तूर्त तरी ही तेढ मिटण्याची चिन्हे नाहीत.

लडाखची लोकसंख्या जेमतेम नव्वद हजारांच्या आसपास. १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे अंदाजे पंचावन्न टक्के बौद्ध, बेचाळीस-त्रेचाळीस टक्के मुसलमान व उरलेले ख्रिस्ती, हिंदू वगैरे. मुसलमान बव्हंशी बहुपत्नीक तर बौद्ध बहुपतित्व पाळणारे! अर्थात बौद्धांच्या प्रमाणात मुसलमानांची संख्या वाढते ह्याच काहीच आश्चर्य नाही. शिवाय, ह्या चालीमुळे बौद्ध मुले मिळत नसल्याने कित्येक बौद्ध मुलींना मुसलमान नवरदेवच शोधावे लागतात. ह्याचा सरळ परिणाम म्हणजे बौद्ध आज झपाट्याने अल्पसंख्यांकात जाऊ लागले आहेत. लडाख मुस्लिम कृतिसमितीचे शेख जमालुद्दीन ह्यांनी तर चक्कच सांगितलं आहे, "लडाखमध्ये मुस्लिमच बहुसंख्येत आहेत." लडाखच्या बौद्ध नेत्यांचं दुःख आहे ते खरं हेच! त्याचसाठी खरा हा लढा. वास्तविक बौद्ध समाजाचं हे सामाजिक दुखणं आहे. त्यासाठीच्या राजकीय लढ्याने काही अंशी फायदे होतीलही, पण समूळ दुखणे उपटले जाऊ शकणार नाही. लडाखमध्ये (कश्मीरमध्येही.) बहुपत्नी प्रतिबंधक कायदा आहे. पण त्यानेही बौद्धांचे दुखणे निपटले जाणार नाही. खरी आवश्यकता आहे ती तिथल्या बौद्धांच्या विचारसरणीत बदल करण्याची, बहुपतित्वाची चाल रूढीनेच रद्द करण्याची! त्यासाठी सामाजिक स्तरावर लडाखचे लामा कुशक, कश्मीरचे लडाखी बौद्ध मंत्री श्री. सोनाम वान्ग्याल आदी बौद्ध नेत्यांच्या प्रयत्नांची खरी आवश्यकता आहे. त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य, रूढींचा विचार न करता, सनातन्यांच्या विरोधात जाऊनही केले पाहिजे. तोपर्यंत मध्यवर्ती शासनानेही ह्या प्रकरणाची गंभीर दखल घेतली पाहिजे. सिमेवरचा प्रदेश असल्याने ते राष्ट्रीय दृष्ट्या अत्यावश्यक आहे. तद्वतच, बहुपतिप्रतिबंधक कायदाही लवकरात लवकर करण्याचे आदेश कश्मीर शासनाला दिले पाहिजेत. ■■




# व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
| --- | --- | --- |
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २



# मुक्ताफळे

## निशाणेच निशाणे !

पाकिस्तानने नागांचा नेता फिझोला ‘ निशाण-ई-पाकिस्तान ’ हा सर्वोच्च नागरी किताब देण्याचे ठरवले आहे. आंतरराष्ट्रीय समजूतदारपणा व स्वातंत्र्याचा पाईक म्हणून ही पदवी त्यांना देण्यात आली आहे. ‘ निशाण-ई-पाकिस्तान ’ हा सर्वोच्च किताब फिझोला दिल्याबद्दल आमची तक्रार नाही; परंतु शेख अब्दुल्लांचा हा अवमान होय असे आम्हांस वाटते. या पाकिस्तानी किताबावर त्यांच्याइतका श्रेष्ठ अधिकार कुणाचाच असू शकत नाही. शत्रूच्या शत्रूला सर्वोच्च किताब देण्याचे हे धोरण सर्वांनी पत्करले तर कितीतरी किताब द्यावे लागतील. मौलाना भाषाणी व भुट्टो यांना भारत सरकारने ‘ निशाण-ई-हिंदोस्तान ’ करून टाकावे. निजलिंगप्पांनी डांगे व बाळ ठाकरे या दोघांना ‘ निशाण-ई-कॉंग्रेस ’ म्हणून जाहीर करावे. अटल बिहारी वाजपेयींनी वसू व करुणानिधींना ‘ निशाण-ई-जनसंघ ’ म्हणायला काही हरकत नाही. क्रेमलिनने पॉम्पिदूकडे ‘ निशाण-ई-सोविएट ’ हा किताब भिरकवावा माओने याह्याखानाला ‘ निशाण-ई-चीन ’ करण्यास हरकत नाही. यामुळे आंतरराष्ट्रीय समजूतदारपणा वाढल्याशिवाय राहणार नाही. इंदिरा गांधींची ‘ निशाणे ’ खांद्यावर टाकून धारिया, चंद्रशेखर या टरकबाज लोकांनी मोरारजीपुढून ठुमकत ठुमकत जावे, म्हणजे परस्पर समजुती पक्क्या होतील !

## वसंत ऋतुतील कोकिळा !

वसंत ऋतूत कोकिळांना आणि वक्त्यांना कंठ फुटतो. ठिकठिकाणी माणसे बोलत राहतात. आपले राज्य हे बहुश: भाषणबाजीने चालते. पूर्वी एकदा असे चाललेले होते तेव्हा सॉक्रेटिसने विचारले, “ Is't not shameful that men should

be ruled by orators who go ringing long harangues like brzsen pots which when struck continue to sound till a hand is put upon them ?" वाजणाऱ्या पितळी भांड्यावर हात टाकल्याखेरीज ती आवाज करायची थांबत नाहीत, हे खरे असले, तरी हात टाकायचे कारण काय ? ही भांडी अखंड वाजत राहिली तर वृत्तपत्रात नाव येते, भाषण छापून येते. तात्पर्य, वृत्तपत्रांची वसंत ऋतूत पंचाईत होते की, भाषणे छापायची तरी कुणाकुणाची. महत्त्वाची भाषणे त्यामुळे सविस्तर छापून येत नाहीत. आता पावसाळा सुरू झाला आहे, तेव्हा अशा दुर्लक्षिलेल्या भाषणांचे थोडे विहंगम दृश्य पाहू या.

"लॉटरी सुरू करणे ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या अधोगतीची निदर्शक आहे. हे सरकार खरोखर यामुळे भांडवलदारांना मदत करीत आहे—तोंडात भाषा मात्र दलितोद्धाराची आहे." – महाराष्ट्राच्या राज्यसभेचे सभापती श्री. पागे यांनी कोल्हापूरला सांगितले. पागेसाहेब, या प्रश्नावर राजीनामा तरी देणार काय ?

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत सांगितले, "नैतिकता ही लौकिक अभ्युदयासाठी पाळू नये. नैतिकतेचे बक्षीस नैतिकता हेच होय !"

तर्कतीर्थ, लॉटरी चालवणे नैतिक की अनैतिक ? अहो, त्यात 'बक्षीस' मिळते! आम्हाला तर जगावेगळे सुंदर घर बांधायचे आहे बुवा. कारण, हल्ली आम्ही राहतो तिथे २५० माणसांना फक्त २ संडास आहेत. सकाळी किती वेळ नुसता उभे राहण्यात जातो !

आचार्य भागवत यांनी एका परिषदेत आग्रहपूर्वक सांगितले—

"सरकारी अनुदान न घेता किंवा कुठूनही पैशाची अपेक्षा न करता समाजसेवा कशी करायची, हे गांधीजींनी आम्हाला शिकवले. महात्माजींच्या नावे सरकारकडे हात पसरणे निंद्य होय !"

महात्माजींच्या नावाने रशिया व अमेरिकेची अनुदाने घेऊन सत्ता टिकविणाऱ्या मंडळींच्याविरुद्ध, गेल्या वीस वर्षांत, आचार्य, तुम्ही एकदा तरी उपोषण करायचे होतेत !

श्रोत्यांचे हाल असतात. या वाजणाऱ्या भांड्यांवर हात टाकणे त्यांना शक्य नसते. हाताच्या घड्या घालून विवेकानंदांच्या पोझमध्ये सगळे ऐकून घेणे एवढेच त्यांच्या माथी असते !

---

## राष्ट्रचिंता कोसिजीन आणि एक चिंतामणी !

---

भिलाई म्हणजे रशियाची भारत-भलाई होय. केंद्रीय पोलादी मंत्री पुनाचा हे सध्या ही भलाई संभाळतात. भारताचे राष्ट्रपिता गेल्यापासून आपण ही जागा

' क्रेमलिन 'मध्ये गहाण ठेवलेली आहे. बाकी सगळ्या जागा निवडणुकीने भरता येतात. ' राष्ट्रचिंता ' कोसिजीन हे आपल्या देशाची सर्व चिंता तूर्त वाहतात. नुकतीच त्यांनी ' भारत-पाक ' संबंधांची याह्याखानाबरोबर चर्चा केली. कोसिजीन आपल्याला पोलादाच्या भट्ट्या बांधून देतातच, त्या शिवाय त्या कशा चालत आहेत, नफा होतो की तोटा, इत्यादी गोष्टी तपासून पाहण्यासाठी अधूनमधून रशियन तंत्रज्ञ भिलाईला येऊन जातात. गहाणखत हातात असलेला सावकार किमान एवढे करणारच ! मग समोरचा माणूस भारताचा पंतप्रधान असला तरी ते त्याची पर्वा करीत नाहीत. भिलाईतील गलथानपणाबद्दल त्यांनी एकदा नेहरूचाचांना कसे सटकावले याची हकीकत सुधीर घोषने ' गांधीज एमिसरी ' या पुस्तकात दिली आहे, ती जिज्ञासूंना वाचता येईल. नुकतीच भिलाईची इन्स्पेक्शन झाली. भारतीय कामगार कारखान्यात ठिकठिकाणी बसलेले पाहून खरे पाहता रशियन इन्स्पेक्टरांना आनंद व्हायला हवा. परंतु ते रागावले. त्यांनी चौकशी केली, " इथे सध्या किती माणसे नोकरीला आहेत ?"

" साहेब, २५,४८७ माणसे इथे तूर्त कामाला आहेत. रजेवर असलेले धरून ३०,००० कामगार आहेत म्हणा ना ! " भिलाईतील एका अधिकाऱ्याने माहिती पुरविली.

या पुढचे बोलणे बहुधा शिव्यागाळीचे असावे; कारण इन्स्पेक्टर संतापलेले होते आणि ते रशियन भाषेत बोलत होते. शिव्या वगळून दुभाष्याने त्याचा मतितार्थ सांगितला तो असा–" ××× नो रुमानियात आम्ही १९५६ साली अशीच पोलादाची भट्टी बांधली. एवढ्याच आकाराची. एवढ्याच क्षमतेची. तिथे फक्त ४,८०० कामगार तो कारखाना उत्तम चालवतात आणि इथे ३०,००० कामगार काय हजामती करतात ? '

संतापलेले आणि म्हणून अधिक ' लाल ' झालेले इन्स्पेक्टर एका विभागात शिरले. इथे प्रत्यक्ष पोलाद निर्माण होते. एक लक्ष मिलियन टन पोलाद निर्मितीला ७,००० कामगार ही आंतरराष्ट्रीय श्रमपातळी समजली जाते. इथे तर १२,००० कामगार होते. रजेवर गेलेले धरून १४,००० म्हणा ना ! इन्स्पेक्टरांनी तडक रिपोर्ट तयार केला आणि दिला पुनाचांकडे पाठवून. कॉपी टू फक्रुद्दीन अली अहमद ! धंदे मंत्री ना ते ! कॉपी दिलेली असावी.

आम्हाला रशियन तंत्रज्ञांचा हा त्रागा समजू शकत नाही. सरकारी कारखाने हे भारतात फायद्यात चालतात हे या लाल इन्स्पेक्टरांना सांगितले कुणी ? एकही कारखाना फायद्यात चालत नाही. खासगी कारखान्यांचे मालक कद्रूपणाने काटकसर करून फायदा उठवतात आणि श्रीमंत होतात. तसे का सरकारने करायचे आहे ? इथल्या अधिकाऱ्यांना गावातल्या निवडणुकीत पडलेल्या फडतुस कॉर्पोरेटरपासून तो मंत्र्यापर्यंत मंडळींच्या सारख्या चिठ्ठ्या येतात–" ही चिठ्ठी घेऊन येणारा

माणूस आपला आहे. कसलीही नोकरी द्यावी. तूर्त रोजावर ठेवला तरी चालेल !" बाहेर बेकारी किती आहे. चिठ्ठ्या येणारच. बेकारांनादेखील निवडणुकीत 'मते' असतातच, तेव्हा सरकारी कारखान्यांतून अशी रोज भरती चालू असताना कामगार नाही वाढणार ? आमचे म्हणणे, कामगार नुसते बसून असले तरी बिघडले कुठे ? शेवटी कारखाने कशाकरता काढले ? राष्ट्रीय संपत्ती वाढावी म्हणून. समजा, संपत्ती वाढली. पुढे काय करायचे ? सर्व लोकांना रोजगार मिळावा या दृष्टीने त्याचा विनियोग हेच ना ? हा द्रविडी प्राणायाम करण्यापेक्षा आता चालू आहे त्यात काय वाईट आहे हे आम्हांला समजत नाही !

श्री. पुनाचा यांनी या इन्स्पेक्टरांकडे लक्ष देऊ नये. त्यांना चांगले खडसवावे. त्यांना हे स्पष्ट सांगावे– कारखाना काढण्याकरता तुम्हाला बोलावले आहे. कारखाना निघाल्यानंतर त्यात माणसे किती लावायची हा आमचा प्रश्न आहे ! एक माणूस जे काम करू शकतो तिथे आम्ही पंधरा लावू. शेवटी आमची खुर्ची टिकवण्यासाठी आम्हाला काही तरी केले पाहिजे की नको ?

इन्स्पेक्टरांचा दुसरा मुद्दा–इथे असलेला स्टॉक हा बेसुमार आहे. त्याचे होणाऱ्या कामाशी किंवा कामगारांच्या संख्येशी कसलेही प्रमाण घातलेले नाही. आमची सर्वसंग्राहक वृत्ती काही नवीन नाही. जगातले सगळे निरुपयोगी लोक जसे आम्ही देशात सन्मानाने पोसतो त्याचप्रमाणे सर्व निरुपयोगी वस्तूदेखील सरकारी भांडारात ठेवलेल्या असतात. अखेर सगळ्यांना आत्मा आहे की नाही ? हा देशच अध्यात्मिक आहे. कारखान्याचे अधिकारी त्या सर्व वस्तूंवर 'प्रेमाचे प्रक्षेपण' करीत असतात. त्याच्या आत 'जो' लपलेला आहे तो बाहेर यावा यासाठी ! या रशियनांना काय कळते हो यातले ?

आणि 'राष्ट्रचिंता' कोसिजीनसाहेबांना आम्ही विचारतो, तुम्ही नाही आम्हाला फसवत ? या देशात तुम्ही आम्हाला तीन औषधांचे कारखाने काढून दिलेत. हृषिकेशला जी यंत्रसामग्री बसवलीत ती पूर्वी तुम्ही पेनिसिलीन तयार करण्यासाठी चीनमध्ये बसवलीत. तिथे पेनिसिलीनच्याऐवजी या यंत्रातून गुरांची वैरण निघू लागली. चिन्यांनी तक्रार करून आकाश-पाताळ एक केल्याबरोबर ती यंत्रसामग्री तिथून उचललीत आणि भारताच्या बोडक्यावर मारलीत ! हृषिकेशच्या कारखान्याची नुकसानी कुणी केली ? बोला पंतप्रधान, बोला ! उपकाराची भाषा करता आणि दामदुप्पट स्वार्थ साधता. भारतीय रेल्वेकडून २५०० रेल्वे डबे खरेदी करण्याचे कंत्राट केलेत आणि प्रत्यक्ष ऑर्डर देताना काय अट घातलीत ? "आमची विमाने घेतलीत तरच तुमचे डबे घेऊ !' चोरांनो, विमाने घ्यायची ती तुमच्या भावाने आणि डबे घ्यायचे तेही तुमच्या भावाने, इतरत्र चांगला भाव मिळत असताना. कोसिजीनसाहेब, तुम्ही आम्हाला फसवलेत तर आम्ही पण तुम्हाला फसवणार ! हृषिकेश नीट चालला नाही तर आम्ही भिलाईला पण वाटेल तेवढे

कामगार लावून तोटा करू! आम्हाला तुम्ही काय दुधखुळे समजता?

पुनाचा– फुकरुद्दीन फेका हो तो इन्स्पेक्शन रिपोर्ट केराच्या टोपलीत! पुढच्या वर्षी ५०,००० कामगार भिलाईला दिसू द्यात. अहो, आम्हाला तरी हे कळण्याचे कारण, चिंतामणी पाणिग्रही या काँग्रेसी सदस्याने लोकसभेत प्रश्न विचारले म्हणून ना? 'राष्ट्रचिंता' कोसिजीन, तुमच्यावर लक्ष ठेवायला आमच्याकडेही चिंतामणी आहेत. चांगले 'पाणि'ग्रही आहेत!!

– ग्यानबा


# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

बेचाळीस रुपये

राजहंस प्रकाशन



# “माझी पत्नी हेर आहे!”

अनंत भावे

लेखांक : एक

युरोपमधील युद्ध जरी संपुष्टात आले तरी हेरांचा शोध घेऊन त्यांना शासन करण्याचे काम लगेच संपले नाही. अर्थात आता हेरांपासून तसा धोका नव्हता; तरीही भविष्याचा विचार करता त्यांना मोकळे राहू देणे इष्ट नव्हते. लाजिरवाण्या पराभवाच्या अखेरच्या घटकेपर्यंत, आणि नंतरदेखील जर्मनीमध्ये काही कडवे आणि कट्टर नाझी होते. त्यांची कारस्थाने, पुढील संधीची वाट पाहत, चालूच राहणार होती. शिवाय न्यायदानाची नैतिक जबाबदारी पार पाडणेही आवश्यकच होते. जर्मनांचे हस्तक आणि युद्ध-गुन्हेगार यांना शासन व्हायला हवेच होते.

युद्ध संपून काही आठवडे लोटले होते. हॉलंडमध्ये, हेगजवळ, स्केव्हेनिंगेन येथे, ‘हॉटेल ऑरेंज’ या भल्या मोठ्या तुरुंगाच्या एका भागात, माझे कार्यालय थाट-

लेले होते. हॉलंडमधील युद्धाशी संबंधित काही बिकट गुन्हेगारांची चौकशी मी करत होतो. एके दिवशी मला एक पत्र आले. एका साध्या कागदावर, पेन्सिलीने, मोठ्या अक्षरात मजकूर लिहिला होता. पत्राखाली सही नव्हती.— "श्रीमती सँडर जर्मनप्रेमी आणि जर्मन हस्तक आहेत. त्यांची चौकशी करणे हे तुमचे कर्तव्य आहे. देशद्रोह्यांना देहान्ताशिवाय गती नाही!"

अशा स्वरूपाची कित्येक पत्रे गेल्या काही दिवसात मला आली होती. पत्राखाली बहुधा सही नसे. युद्धाने अशी घुळवड नेहमीच माजते; आणि ती शमायला बराच काळ जावा लागतो. पाच वर्षे शत्रूने ठाण मांडलेल्या हॉलंडसारख्या देशात तर ती विशेष माजणे अपरिहार्य होते. जेत्या शत्रूशी झगडण्यापेक्षा त्याच्या कलाने घेणे काही नागरिकांना सोयीचे जाते. महापौर, डॉक्टर, धर्मोपदेशक यांच्यासारख्या दुसऱ्या काही लोकांपुढे मोठा पेच पडलेला असतो. आपली कामे तशीच चालू ठेवून स्थानिक लोकांची देखभाल करायची म्हटली म्हणजे नाही म्हटले तरी शत्रूशी सहकार्य करणे भाग पडते. नाहीतर वैयक्तिक राष्ट्राभिमानासाठी भूमिगत चळवळीत सामील झाल्यास त्यांची अधिकृत कामेच थंड पडतात. पुन्हा असेही काही स्त्री-पुरुष असतात, की जे युद्ध संपल्यावर, खऱ्या वा कल्पित गुन्हेगारांचा रहस्यभेद करायला उतावीळ झालेले असतात. त्यामागे कधी खरोखरीच देशभक्तिप्रेरित कळकळ असते, तर कधी जुन्या शत्रुत्वाचे उट्टे काढण्याचा प्रयत्न असतो. कधी अजाणता हे दोन्ही हेतू एकमेकांत गुंतलेले असतात.

मी ते निनावी पत्र बारकाईने पाहिले. कागद सर्वसाधारण आकाराचा होता त्यावर तो बनविणाऱ्या कारखान्याचा शिक्का नव्हता. खरे म्हणजे विशेष लक्षात घेण्याजोगे त्या कागदात काहीच नव्हते. लिहिणे एखाद्या सुशिक्षित व्यक्तीचे वाटत होते. तिने मजकूर घाईत लिहिलेला असावा. कारण अक्षरे एकमेकांत गिचमिडली होती. पूर्णविरामाभोवती एक छोटेसे वर्तुळ काढण्याची सवय लिहिणाऱ्याला असावी. त्या पत्रावरून मला पामराला बोध मिळाला तो एवढाच. याहून अधिक काही कळायला मी शेरलॉक होम्स थोडाच होतो? ते पत्र चुरगाळून फेकून द्यावे, असा मोह मला प्रथम झाला. मला पुष्कळच कामे होती. माझ्या हाताखाली पुरेशी माणसे नव्हती. शिवाय एखाद्या व्यक्तीविरुद्ध असा गंभीर आरोप करताना तो नावानिशी न करणाऱ्या माणसाच्या भेकडपणाचा मला तिटकारा होता. पण अखेर मला झालेला मोह मी टाळला. पत्र लिहिणाऱ्या अनामिक व्यक्तीने म्हटल्याप्रमाणे, अशा प्रकरणांची चौकशी करणे हे माझे कर्तव्यच होते. आणि ते आरोपित व्यक्तीवर अन्याय होऊ न देण्याच्या दृष्टीने आवश्यक होते. कोणाला तरी, अनामिक राहून, श्रीमती सँडरच्या बाबतीत असे गलिच्छ आरोप माझ्यापाशी करण्याची आवश्यकता भासावी याचा अर्थ त्यांच्याबद्दल नाही नाही त्या अफवा वातावरणात उठल्या असण्याची दाट शक्यता होती. कोणी सांगावे, मारण्याच्या धमक्यादेखील

त्यांना दिल्या गेल्या असतील. श्रीमती सँडर जर निरपराध असेल — आणि ती बहुधा तशी असावी असा माझा अंदाज होता — तर किमान मी चौकशी करून तिचे निरपराधित्व भोवतालच्या लोकांना पटवू शकत होतो.

## सँडरचे साहस

सँडर हे नाव अनेक डच कुटूंबांचे असते. एक-दोन दिवसांत सँडर आडनावाच्या साऱ्या विवाहित स्त्रियांची एक यादी मी तयार केली. त्या यादीतून अनुमानपद्धतीने, एक एक नाव वगळता अखेर फक्त एक नाव उरले. हीच ती संशयित श्रीमती सँडर असली पाहिजे, अशी माझी खात्री झाली. तिच्या यजमानांच्या मालकीचा एक छोटासा छापखाना होता. तो विभाग जिंकल्यावर जर्मनांनी श्रीयुत सँडरचा छापखाना ताब्यात घेतला होता आणि आपल्या कामासाठी ती यांत्रिक सामग्री आणि खुद्द श्रीयुत सँडर यांना राबवले होते. सर्वानुमते सँडर हा देशनिष्ठ होता आणि जर्मनांच्या करडया नजरेखाली काम करावे लागत असूनदेखील त्याने भूमिगत चळवळीला बहुमोल साहाय्य केले. छापखान्याची इमारत त्याच्या मालकीची होती. इमारतीच्या तळमजल्यावर छापखाना चालत असे आणि वरच्या दोन मजल्यांवर सँडर पतिपत्नींना राहण्याची व्यवस्था होती. जर्मनांनी या जागेपैकीदेखील काही भाग वरिष्ठ जर्मन गेस्टॅपो अधिकाऱ्याच्या निवासासाठी हिरावून घेतला होता. त्यात तो वरिष्ठ अधिकारी आणि त्याचा मोजका परिवार राहत असे.

सँडरचा छापखाना चांगल्या प्रतीचा होता; म्हणून जर्मनांनी सँडरच्या साहाय्याने तो आपल्या उपयोगासाठी राबवला. त्या विभागातील जर्मन सैन्याला देण्यात येणारी हुकूमपत्रके या छापखान्यात छापली जाऊ लागली. छापखाना चालवण्याचे काम सँडर करत असे; मात्र त्याने ती हुकूमपत्रके वाचू नयेत म्हणून एक पहारेकरी सतत डोळयात तेल घालून त्याच्यावर पहारा करी. तरीदेखील हिकमती सँडरने भूमिगत चळवळीला बहुमोल माहिती पुरवलीच.

नंतर १९४४ सालच्या जुलैमध्ये, डी—दिनाची मोहीम सुरू होऊन बरेच दिवस उलटल्यानंतर, सँडरला अकस्मात अटक झाली. कदाचित तो गैरसावध झाला असावा किंवा कदाचित भूमिगत चळवळीच्या हाती आपली अनेक रहस्ये पडतात हे ध्यानात आल्यावर जर्मनांनी लावलेल्या सापळयात सँडर अडकला असावा. काही दिवस तो बंदिवासात होता आणि नंतर अचानक तो नाहीसा झाला. भूमिगत चळवळीतील कोणालाही त्याचे काय झाले याचा त्या वेळी पत्ता नव्हता. बहुधा कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्ये त्याचा अंत झाला असावा किंवा हेरगिरीबद्दल देहान्ताची सजा त्याला देण्यात आली असावी, असा सर्वांचा तर्क होता.

परंतु, युद्ध संपायला एक महिना असताना, १९४५ सालच्या एप्रिलमध्ये सँडर अकस्मात प्रकट झाला. त्या वेळी तो देहा-मनाने पार खंगलेला होता. त्याने

सांगितलेल्या माहितीप्रमाणे गेस्टॅपोने त्याचा अनन्वित छळ केला होता. त्याला बोलता करण्यासाठी त्याच्या डाव्या हाताच्या पाठीवर सिगारेटचे जळजळीत डाग देण्यात आले होते. त्याच्या विद्रूप खुणा स्पष्ट दिसत होत्या. परंतु सँडरने तोंडाला घातलेले कुलूप उघडले नव्हते. नंतर त्याची रवानगी वायव्य जर्मनीमधील एका खास तुरुंगात करण्यात आली होती; कारण, भूमिगत चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून त्याला पळवण्याचा प्रयत्न होईल अशी भीती गेस्टॅपोला वाटली होती. दुसरी आघाडी उघडून दोस्तांनी जर्मनव्याप्त युरोपीय देश मुक्त करायला सुरुवात केली. दोस्तांच्या फौजा वायव्य जर्मनीजवळ आल्या तेव्हा तेथील तुरुंगातील कैद्यांना पायीच पूर्वेला हलवण्यात आले होते. नंतर भरदिवसा शाही विमानदलाने केलेल्या एका हवाई हल्ल्याच्या घुमश्चक्रीत सँडरने संधी साधून पलायन केले. युद्धाने उध्वस्त झालेल्या जर्मनीमध्ये तो अनेक दिवस भटकत राहिला. सरतेशेवटी त्याची एका कॅनेडियन तुकडीशी गाठ पडली. दोस्तांच्या गुप्तहेरखात्याने त्याची उलटतपासणी घेऊन त्याला हॉलंडमधील या त्याच्या गावी परत पाठवले होते.

साहजिकच स्थानिक लोकांनी सँडरचा वीरपुरुष म्हणून गौरव केला होता. भूमिगत चळवळीत निर्धाराने काम करणारा, जर्मनांनी अनन्वित छळ केल्यावरही न मोडणारा, इतकेच नव्हे तर त्यांच्या कैदेतून धाडसाने निसटून आलेला सँडर गावकऱ्यांच्या स्तुतीला सर्वथैव पात्र होता. परंतु सँडर परतण्याआधी काही आठवडे त्याच्या बायकोबद्दल मात्र नाही नाही त्या अफवा लोकांत पसरल्या होत्या. युद्धापूर्वी, बरीच वर्षे अॅम्सटरडॅममध्ये राहिल्यामुळे जवळपास श्रीमती सँडरना कोणी सगेसोयरे नव्हते. म्हणून सँडरला अटक झाल्यानंतर देखील ती आपल्या घरात एकटीच राहिली होती. गेस्टॅपोचा वरिष्ठ अधिकारी आणि त्याचा परिवार अर्थात तेथेच होता. गप्प अशी उठली होती की, सँडरच्या अटकेनंतर काही दिवसातच श्रीमती सँडर त्या गेस्टॅपो अधिकाऱ्याची रखेली झाली होती. काहीजणांच्या मते तर पहिल्यापासूनच तिने सँडरशी प्रतारणा केली होती. म्हणजे इकडे सँडर जर्मनांची नजर चुकवून भूमिगत चळवळीला गुप्तपणे मदत करत होता आणि तिकडे श्रीमती सँडर चोरून गेस्टॅपो अधिकाऱ्याचा रंगमहाल सजवीत होती!

जर्मन फौजा तेथे असेपर्यंत याबाबत कोणाला काहीच करता येत नव्हते. आणि दोस्तांच्या मुसंडीपुढे नांगी टाकून जर्मन फौजांनी माघार घेतल्यावर थोड्याच दिवसांत सँडर स्वतःच दत्त म्हणून प्रकट झाला होता. महापौर त्यांच्या प्राथमिक उलटतपासणीत माझ्याजवळ म्हणाले तसा एक मोठाच प्रश्न निर्माण झाला होता. सँडरवर स्तुतिसुमने उधळली जात असताना त्याच्या बायकोबद्दलच्या अफवांची वाच्यता कोण करणार? वरवर पाहता खुद्द सँडरला कसलाही संशय आला नव्हता; आणि आपल्या पत्नीबरोबर त्याचा सुखाचा संसार पुन्हा सुरू झाला. मात्र तसा कोणताही बिनतोड पुरावा उपलब्ध नसला तरी, अनेकांच्या मी

घेतलेल्या उलटतपासणीत माझ्या ध्यानात आले होते की, गावकऱ्यांचा सँडरच्या शौर्यावर जितका विश्वास होता तितकाच श्रीमती सँडरच्या बदफैलीपणावर होता.

### "आपण वाचून पाहा हे–"

महापौरांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच बिकट समस्या होती ही. मी अनेक दिवस तिच्यावर विचार केला. ते निनावी पत्र फाडून हे प्रकरण उद्‌भवण्या-आधी नष्ट करावे काय ? की उलटतपासणी करून वरवर पाहता सुखी असलेल्या सँडर दांपत्याच्या संसाराचे विदारक विश्लेषण करावे ? अखेर मी उलटतपासणी करण्याचा निर्णय घेतला. अफवांना वाव मिळू नये म्हणून श्रीमती सँडरला माझ्या कार्यालयात भेटायला बोलावण्याऐवजी सहज म्हणून मीच तिला भेटायला जायचे ठरवले. ती एकटी भेटावी म्हणून, निश्चित तिचा नवरा कामाला गेला असेल अशी वेळ मी भेटीसाठी निवडली.

स्वत: श्रीमती सँडरनेच दार उघडले. मी तिला स्वत:चा परिचय करून दिला तेव्हा तिने मला कॉफीपानासाठी अगत्याने थांबवून घेतले. आम्ही लहानसहान व्यावहारिक गोष्टींबाबत बोलत राहिलो. बोलताबोलता मी एकीकडे श्रीमती सँडरला अजमावण्याचा प्रयत्न करत होतो. श्रीमती सँडर तिशीतील एक बांधेसूद आणि आकर्षक युवती होती. ती जशी अप्रतिम सुंदर नव्हती तशीच फारशी मादकही नव्हती. परंतु तिच्याजवळ एक नाजुक गोडवा, मोकळेपणा आणि आश्वासकता होती. आपल्या कुटुंबापासून आणि घरापासून दूर, भीषण लढाईत दीर्घकाळ भाग घेणारा वरिष्ठ जर्मन अधिकारी दिलाशासाठी तिच्यासारखीचा अनुनय नक्कीच करील असे मला वाटले.

शिवाय श्रीमती सँडर चलाखही होती. काही मिनिटांच्या औपचारिक, जुजबी संभाषणानंतर ती हसली आणि मोहक मोकळेपणाने म्हणाली, "कर्नल पिंटो, तुम्ही फार कामात असता हे माहीत आहे मला; आणि त्यामुळं सहज हवा-पाण्याच्या आणि युद्धोत्तर राहणीच्या गप्पा मारायला नक्कीच आला नाहीत तुम्ही माझ्याकडे. तुम्ही इथं यायला तसंच काही महत्त्वाचं कारण असणार, खरं की नाही ? "

मी हसलो आणि मान हलवली, "खरं आहे. तुम्ही म्हणता तसं महत्त्वाचं कारण आहे. मी सांगतोच आपल्याला ते."

आता श्रीमती सँडरने मान हलवली. मी काही न बोलता, माझ्या पाकिटातून ते निनावी पत्र काढले आणि तिच्या हातात ठेवत म्हटले, "आपण वाचून पाहा हे."

श्रीमती सँडरने पत्र पाहिले. ती चमकली. तिचा चेहरा पांढराफटक पडला. तिच्या हातातून तो कागद गळून पडला आणि मी तो तत्परतेने हस्तगत केला. तिने दोन्ही हातात आपला शरमिंदा चेहरा लपवला आणि तशीच अवघडून काही मिनिटे ती बसून राहिली.



'कर्नल पिंटो, तुम्ही येथे यायला काहीतरी महत्त्वाच कारण असणार हे नक्कीच.'

## मेजर हॉटमान

ती शांत होण्याची वाट पाहत मीही बसून राहिलो. सरतेशेवटी तिने डोके वर केले आणि कोरड्या आवाजात विचारले, "कर्नल पिंटो, लोकांची उलटतपासणी घेण्याचा तुम्हांला पुष्कळच अनुभव असेल नाही ?"

"होय."

"आणि त्यात त्या माणसाकडून अखेर सत्य वदवून घेणं बहुतेक वेळा तुम्हांला जमतं. खरं ना ?"

मी खांदे उडवले. म्हणालो, "होय, आपण म्हणता ते पुष्कळसं खरं आहे."

"मग तुमच्याजवळ बनवाबनवी करण्यात काही अर्थ नाही. काहीही झालं तरी सत्य हे तुम्हाला कळणारच– हे तुम्ही दाखवलेलं पत्र–ते खरं आहे आणि खरं नाही देखील. मी असं का म्हणते याचं स्पष्टीकरण देते तुम्हांला; म्हणजे तुम्हालाही पटेल माझं म्हणणं."

मग तिने आपली संपूर्ण कहाणी मला सांगितली. प्रथम तिचे निवेदन घोटाळ्याचे आणि सूत्रहीन होते. पण हळूहळू ते स्वच्छ आणि सरळ झाले. पाच वर्षांच्या जर्मन आधिपत्याच्या दीर्घकाळात कितीतरी वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्यांचा मुक्काम सँडरच्या घरी होता. विनापवाद त्या साऱ्यांची वर्तणूक सभ्य होती. आपल्या निवासाच्या कक्षा ओलांडून सँडरच्या जागेवर त्यांचे अतिक्रमण सहसा होत नसे. आणि जरूर पडेल तेव्हाच बोलण्याची त्यांची रीत होती.

१९४४ सालच्या मध्यास, तेथे असलेल्या एका वरिष्ठ जर्मन अधिकाऱ्याची बदली होऊन कोणी एक मेजर हॉटमान तेथे राहायला आला. हॉटमान रशियन आघाडीवर जबर जखमी झाला होता; आणि आता विश्रांतिकालात हॉलंडमधील अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली होती. तो तरुण होता इतकेच नव्हे तर, श्रीमती सँडरच्या कबुलीप्रमाणे तेथे राहून गेलेल्या त्याच्या सहकाऱ्यांपेक्षा कितीतरी आकर्षक होता. शिवाय त्याच्या वागण्यात शिष्ट औपचारिकपणा नव्हता. सँडर पतिपत्नींची गाठभेट झाली म्हणजे तो सहज हसत–बोलत असे. एकदा–

दोनदा तर त्याने सँडर दांपत्याला कॉफीपानाचे आणि भोजनाचेही आमंत्रण दिले होते. युद्धकाळात ती एक पर्वणीच होती. आश्चर्याची गोष्ट अशी की, शत्रूशी सलगी करणे गर्हणीय आहे, अशा निष्ठेने श्रीमती सँडर मेजर हॉटमानशी तुटकपणे वागली तरी तिच्या नवऱ्याने मात्र हॉटमानशी मैत्री करण्यास तिला उद्युक्त केले. इतकेच नव्हे तर, सतत प्रोत्साहन दिले. आपल्या नवऱ्याचा भूमिगत चळवळीशी संबंध आहे, हे तिला ठाऊक होते. त्या संबंधांचे नेमके स्वरूप तिला ठाऊक नव्हते; आणि तिनेही समजूतदारपणे त्याची जादा चौकशी कधी केली नाही. हॉटमानशी आपल्याला सलगी करायला प्रोत्साहन देण्यामागे या भूमिगत चळवळीला मदत व्हावी हाच आपल्या पतीचा हेतू असावा, असे तिला साहजिकच वाटले.

आणि कालांतराने अचानक विपरीत घडले. मेजर हॉटमान राहायला येऊन पुरे दोन महिने होण्याच्या आतच एका सकाळी सँडरला अटक करण्यात आली. तो जिन्यावरून धावत वर आला, आपल्या पत्नीचे त्याने चुंबन घेतले, अटकेची वार्ता तिला कशीबशी सांगितली आणि इतक्यात दारावर पोलिसांची थाप पडली. दोन पोलीस आत आले आणि सँडरला फरफटत घेऊन गेले.

त्याच रात्री श्रीमती सँडरच्या दरवाजावर आणखी एक, पण नाजूक थाप पडली. तिने दार उघडले. बाहेर मेजर हॉटमान उभा होता. त्याने सँडर तूर्त तरी खुशाल आहे, मात्र तसा तो फार काळ राहू शकणार नाही, असे तिला सांगितले. सँडर जर्मन साम्राज्याचा शत्रू होता आणि युद्धप्रयत्नांत विघ्न आणल्याबद्दल त्याला देहान्ताची शिक्षा मिळणे अपरिहार्य होते. मात्र सुदैवाने सँडरचे प्रकरण मेजर हॉटमानच्याच हातात होते. त्याची सहीसलामत सुटका होणे अशक्यच होते; पण देहान्ताऐवजी कदाचित त्याची तुरुंगात पाठवणी करण्याची व्यवस्था मेजर हॉटमान करू शकत होता. पण हा शिक्षाबदल तिच्यावरच अवलंबून आहे, असे मेजरने तिला सांगितले. आपल्या नवऱ्याच्या प्राणरक्षणासाठी ती काही मोबदला द्यायला तयार आहे काय, असा सवाल होता. कसला मोबदला? अर्थात तिच्या सुंदर, कमनीय देहाचा. पतीचे प्राणरक्षण की आपले शीलरक्षण, असा मोठा गंभीर पेच हॉटमान-कडून श्रीमती सँडरपुढे टाकण्यात आला होता!

असला विचित्र आणि ओंगळ पेच टाकणाऱ्या शत्रुपक्षाच्या त्या अधिकाऱ्याचे स्मित करणारे थोबाड ओरबाडून रक्तबंबाळ करावे, अशी श्रीमती सँडरची प्रथम प्रतिक्रिया झाली. मग ती थांबली आणि विचार करू लागली. अधिक विचार करण्यासाठी तिने सवड मागून घेतली. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊपर्यंत तिने निर्णय घ्यावा, असे मेजर हॉटमानने बजावले. रात्रभर ती जागीच होती. काय करावे याचा विचार करत शयनगृहात फेऱ्या मारत होती. आपल्या पतीवर तिचे आत्यंतिक प्रेम होते. आजवर तिच्याकडून कधीही प्रतारणा झाली नव्हती. तिने स्वतःचीच समजूत घालण्याचा प्रयत्न केला : मेजर हॉटमान कदाचित खोटेच सांगत असेल आणि

आपण या विचित्र विनिमयाला नकार दिला तरीही सँडर जिवंत राहील...पण हा आपला अंदाज खोटा ठरला तर? आपल्या नकारामुळे खवळलेल्या हॉटमानने सँडरची तडकाफडकी वासलात लावली तर? कारण, हॉटमानने आपली मागणी अत्यंत गांभीर्याने आणि निक्षून केली होती. इतकेच नव्हे तर या व्यवहारातील एक शब्द जरी श्रीमती सँडरकडून फुटला तरी मेजर हॉटमान केवळ या आरोपाचा इन्कारच करून थांबणार नव्हता; तर सँडरची देहांत सजा तत्परतेने अंमलात आणणार होता. त्यामुळे पतीच्या कोणा स्नेह्याचा सल्ला घेणेदेखील श्रीमती सँडरला अशक्य होते.

## मेजर हॉटमानची रखेली

मग दुसरा एक विचार तिच्या मनात आला. मेजर हॉटमानशी शय्यासोबत केली तरी पतीच्या प्राणरक्षणाबाबत तो आपला शब्द पाळील, याची हमी कशी देता येणार? त्याच्या हातात सँडरचे प्राण वाचवण्याचे अधिकार खरोखरच आहेत का? उद्या समजा, एखाद्या अधिक मोठ्या अधिकाऱ्याने स्वतंत्रपणे सँडर-प्रकरणाची चौकशी करायचे ठरवले तर?...पण हा धोका पत्करल्यावाचून, प्राप्त परिस्थितीत, गत्यंतरच नाही, असे अखेर तिला पटले. तिने नकार दिला तर, मेजर हॉटमानच्या म्हणण्याप्रमाणे, तिचा पती निश्चित मरणार होता. तिच्या होकाराने तो वाचण्याची अल्पमात्र तरी शक्यता होती. मेजरच्या निंद्य सूचनेचा संताप येऊनदेखील, कसे कोणास ठाऊक, पण, दिलेला शब्द तो पाळील, असे श्रीमती सँडरला वाटले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तिने आपला निर्णय मेजर हॉटमानला सांगितला. फक्त सँडरला देहान्ताची सजा झाली नाही याबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा मेजर हॉटमानने आपल्याला सादर करावा, अशी अट तिने घातली. दोन दिवसांनी मेजर हॉटमानने गेस्टॅपोच्या गुप्त हुकमाची एक प्रत आणून श्रीमती सँडरच्या हातात ठेवली. त्या हुकमाप्रमाणे, सँडरवर हेरगिरीचा आरोप शाबित होऊन त्याची रवानगी कैदखान्यात करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशीच, सशस्त्र पोलीस-पहाऱ्यात, त्याची पाठवणी वायव्य जर्मनीत करण्यात येणार होती.

श्रीमती सँडरला त्यानंतर आपल्या पतीची प्रत्यक्ष भेट देखील घेता आली. पण हा भेटीचा वृत्तान्त मला सांगताना ती पार उन्मळून गेली होती. सँडरने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण ज्या मार्गाने त्याचा शिक्षाबदल घडून आला होता त्याचा विचार मनात येऊन ती आक्रंदन करू लागली. तो तिला जवळ घेऊ लागला आणि ती शहारून दूर सरत होती. पुढे होणाऱ्या विक्रयाने आपला देह विटाळला आहे, असे तिला वाटत राहिले.

त्याच रात्री आपला देह तिने मेजर हॉटमानच्या स्वाधीन केला. जवळजवळ सहा महिने ती हॉटमानची रखेली होऊन राहिली होती. सँडर जिवंत असून

खुशाल आहे असे हॉटमान तिला मधूनमधून सांगे. एकदा तर त्याने सँडरची चिठी तिला वाचायला दिली. सँडरचे अक्षर तिने सहज ओळखले. मेजरने तिला प्रेमभेटी द्यायचा प्रयत्न केला; तिचा शिधा गुप्तपणे वाढवण्याची तयारी दर्शवली. पण तिने या सगळ्या मेहेरबानीला निग्रहाने नकार दिला. नाइलाजास्तव आपला स्वाभिमान आणि देह तिने विकला होता हेच पुष्कळ होते. वस्तूंच्या स्वरूपात त्याचा अधिक मोबदला घेण्याने आपण हीन असे वेश्याकर्म केल्यासारखे होईल, असे तिला वाटले.

अधिक सांगण्यासारखे काही उरले नव्हते.

आरडेनीजमध्ये हिटलरने दोस्तांशी टक्कर देण्याचा अखेरचा यत्न केला; पण तो अयशस्वी झाला. आणि एकापाठोपाठ एक युरोपातील जर्मन सेनादले पितृभूमीच्या संरक्षणासाठी परत बोलवण्यात आली. मेजर हॉटमान आता पूर्ण बरा होऊन युद्धात पुन्हा भाग घ्यायला तयार झाला होता. १९४५ सालच्या सुरुवातीला त्याला बर्लिनला जावे लागले.

दुसरा कोणताही जर्मन अधिकारी हॉटमानच्या जागी पाठवण्यात आला नव्हता. त्यामुळे काही महिने श्रीमती सँडर एकटीच घरात होती. बाजारहाटासाठी गावात गेल्यानंतर तिचे स्वागत ज्या तऱ्हेने होई त्यावरून गावातील लोकांना मेजरशी असलेल्या आपल्या संबंधांची कुणकुण लागली आहे, असे तिच्या लक्षात आले होते. मजरच्या कोठल्या तरी वेंधळ्या वा तोंडाळ नोकराकडून ते गुपित षट्कर्णी झाले असले पाहिजे. मात्र कोणीही तिच्यावर उघड आरोप करत नव्हते; आणि त्यामुळे त्या मूक दोषारोपाचा इन्कार करणे तिला अशक्य होऊन बसले.

याहीपेक्षा एक महत्त्वाचा प्रश्न आता तिच्यापुढे उभा राहिला होता. मेजर हॉटमान गेल्यानंतर सँडरची वार्ता कळण्याचे कसलेही साधन तिच्याजवळ नव्हते. त्याच्या खुशालीबद्दलची अखेरची वार्ता, १९४४ च्या डिसेंबरमध्ये तिला मिळाली होती. पण आता दिवसेंदिवस जर्मनीमध्ये अंदाधुंदी माजत होती. अफवांचे पेव फुटले होते. कॉन्सेन्ट्रेशन कँपमध्ये असलेल्या सगळ्यांच्या हत्येचा हुकूम हिटलरने दिल्याची एक बातमी होती. त्या उलट, गुप्त संदेशांच्या कल्पक प्रसार-योजनेने सगळ्या तुरुंगांमध्ये संपर्क प्रस्थापित होऊन संघटित कैद्यांनी एकसमयावच्छेदेकरून पळून जाण्यात यश मिळवल्याची दुसरी बातमी होती. अशा परस्परविरोधी अनेक बातम्या कानांवर येत होत्या. सँडर जिवंत आहे का मेला, हे कळणे श्रीमती सँडरला अशक्य होऊन बसले. तिचे आपल्या पतीवर आत्यंतिक प्रेम होते; आणि त्यामुळे कधीकधी तो त्वरेने मृत्यू पावेल तर हालअपेष्टांतून तरी सुटेल असे तिला वाटे. सँडर परत आल्यानंतर त्याला कोठल्या तोंडाने भेटायचे, हा प्रश्न तिला सारखा भेडसावत होता.

## सँडर परत आला

आणि एके दिवशी सँडर खरोखरच परत आला. त्याच्या देहाची दुर्दशा झाली

होती. तो जिवंत होता हेच पुष्कळ होते. तो इतका शक्तिहीन झाला होता की, एखाद्या नवजात बालकाची मातेने करावी तशी त्याची देखभाल कित्येक दिवस श्रीमती सँडरला करावी लागली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या मागे पत्नीने कसे दिवस काढले हे जाणून घेण्याची इच्छा सँडरने कधी दाखवली नाही. तो नेहमी कॉन्सेन्ट्रेशन कॅंपबद्दल बोलायचा. गॅस चेम्बरमध्ये जाण्याची कधी कोणावर पाळी येईल हे माहीत नसल्यामुळे मनात कायम दडलेल्या भयाबद्दल बोलायचा.

बऱ्याच कालावधीनंतर तो पूर्वीसारखा ठणठणीत झाला. सँडर दांपत्याचा संसार नव्याने सुरू झाला. पण तोपर्यंत, आपण ज्या पद्धतीने पतीचे प्राण वाचवले त्याबद्दल प्रत्यक्ष त्याच्याजवळ स्पष्ट कबुली देणे आपल्याला कधीच जमणार नाही, हे श्रीमती सँडरला कळून चुकले होते. सँडरची युद्धपूर्वकाळातील धडाडी आणि स्वत: निर्णय घेण्याची क्षमता थोडीशी क्षीण झाल्यासारखे तिला वाटले. शिवाय छपाईकामातील त्याचे लक्ष उडाले होते. यंत्रांच्या घरघराटाने डोके दुखायला लागते, असे तो सांगायचा. त्यामुळे एकतर तो आपल्या पूर्वीच्या मित्रांना भेटायला जायचा किंवा श्रीमती सँडर घरात काम करत असता तिच्या मागे मागे असायचा. पहिल्या उद्रेकानंतर तो फारसा कधी बोलतच नसे. सारखा गप्प राही. पण त्याच्याकडे लक्ष नाही अशी खात्री झाली म्हणजे कधी कधी तो विचित्र नजरेने आपल्याकडे टक लावून पाहत राहतो, असे श्रीमती सँडरच्या लक्षात आले होते. दैनंदिन व्यवहारातील लहानसहान गोष्टींबाबत तो अधिकाधिक तिच्यावर अवलंबून राहू लागला होता.

श्रीमती सँडरचे दीर्घकथन संपले आणि खोलीत सन्नाटा पसरला. महिनोन्‌महिने उरात दडवलेले गुपित प्रथमच मोकळेपणाने बोलून दाखवल्यानंतर ती अधिकच संकोचल्यासारखी झाली. जणू तिचा आता अधिकच गोंधळ उडाला होता. मी मात्र मनात तिच्या कहाणीची काळजीपूर्वक उजळणी करत होतो; तिचे दुवे पक्के करत होतो. तिची कहाणी जशीच्या तशी खरी मानण्याकडे मनाचा कल होत होता; पण अजून खात्री करून घेण्याची आवश्यकता होती.

आणि म्हणूनच तिची उलटतपासणी घेण्याचे मी मनात ठरवले.

[ अपूर्ण ]

# अंधार-उजेड



अनिल नाडकर्णी

## मुंबईतील आंतरबँक नाट्यस्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्पोर्टस् क्लबतर्फे आयोजित आन्तरबँक नाटचस्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धा दि. १३, १४ व १५ मे रोजी मुंबईच्या साहित्यसंघ मंदीर येथे झाल्या.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्पोर्टस् क्लबच्या विद्यमाने आयोजन ही दहावी एकांकिका स्पर्धा असून बँकांमधील हौशी कलाकारांना नाटच, अभिनय इत्यादी दृष्टचा त्यांना उत्तेजन देण्याच्या मिषाने या स्पर्धेचे आयोजित करण्यात येतं.

यंदाच्या एकांकिका स्पर्धेत एकूण तेरा बँकांनी भाग घेतला. दि. १३ रोजी पाच एकांकिका सादर करण्यात आल्या. 'दोन यमांचा फार्स, 'मद्रासीने केला मराठी भ्रतार,' 'महानिर्वाण', 'भुस्कुटयाचा आजार' आणि 'शरण तुला भगवंता' या त्या एकांकिका.

नॅशनल अॅन्ड ग्रिंडलेज बँकेने शं. ना. नवऱ्यांची 'दोन यमांचा फार्स' ही एकांकिका सादर केली. दिनानाथ गोसावी (भुस्कुटे), प्रभाकर पोतनीस (कदम), मनोहर देशपांडे (यम) आणि सरोज कुलकर्णी (मैना) यांच्याच भूमिका ध्यानात राहण्याजोग्या झाल्या. इतर पात्रांना विशेष असा वावच नव्हता. त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने वसंत कानेटकरांची 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' ही विनोदी एकांकिका दृष्ट लागेल अशा रीतिने सादर करून दाखवली. साधीच, पण सुबकपणे केलेली नेपथ्यरचना, प्रकाशयोजना यामुळे एकांकिकेला अधिक उठाव प्राप्त झाला होता. एका स्टेशन-मास्तरच्या घरात घडत असलेला प्रसंग या एकांकिकेत

चित्रित करण्यात आला आहे. स्टेशनमास्तर व त्याची वरून खाष्ट पण अंतर्यामी ममताळू अशी पत्नी ' मनकर्णिका ' यांचा मुलगा ' किसन ' हा आपल्या आई-बापाला थांगपत्ता न लागू देता आपल्या मद्रासी भाडेकरूची लेक ' रुक्मिणी ' हिच्याशी लग्न करतो आणि मग पुढे काय नि कसा गोंधळ उडतो हे इतक्या सुरेखपणे स्टेट बँकेने दाखवले, की ही एकांकिका संपली केव्हा हे देखील प्रेक्षकांच्या लक्षात आलं नाही. ' रुक्मिणी'ची भूमिका पुष्पा मानकर हिने अत्यंत सफाईने रंगवली. तिचा तो मद्रासी सूर, तिचं ते लाजणं, मध्येच मोडकंतोडकं इंग्रजी बोलणं यामुळे ' रुक्मिणी'ची भूमिका जिवंत वाटत होती. तिचा बाप ' दोराय-स्वामी'! याची भूमिका अशोक सराफने बेमालूम वठवली. डांबरवर्ण, धिप्पाड देह, त्यावर पांढरी लुंगी या अवतारात अशोक सराफ म्हणजे साक्षात मद्रासी वाटत होते. त्यांच्या सहज अभिनयाने प्रेक्षकांमधून सतत हास्य-फवारे उडत होते. त्याचप्रमाणे प्रवीण पाटील (रामा), रमेश पवार (जॉनी डिकॉस्टा), अरुण संझ-गिरी (किसन) यांचाही अभिनय पाहण्याजोगा असाच होता. अण्णा पडवळांचा स्टेशन-मास्तर चांगला वठला. कु. तारका ठेंगडी यांनी ' मनकर्णिका ' तर कमालीची ठसक्यात रंगवली. आप्पा पडवळांचे दिग्दर्शन निर्दोष अन् तितकेच चपखल असे होते.

एकांकिकेनंतर युनियन बँकेने ' महानिर्वाण ' ही एकांकिका करून दाखवली. वास्तविक, मुळात ही एकांकिका नसून श्रीराम लागूंच्या ' एक होती राणी ' या नाटकाच्या दोन अंकांचं संपादन करून तयार करण्यात आलेलं स्क्रिप्टच होय. प्रत्यक्ष दासीलाच राणी समजून कैद केल्यावर, तिने जनतेवर केलेल्या अन्यायाचा जाब विचारून कॅप्टन, सार्जंट तिला नामोहरम करतात अशी कथावस्तु असलेल्या या एकांकिकेत ' ती ' झाल्या होत्या मुग्धा विचारे. त्यांचा अभिनय सुंदर होता. कॅप्टन ' म्हणून राजा बापट मात्र शोभत नव्हते. चार्टर्ड बँकेने यंदा ' भुस्कुटयांचा आजार ' हा ' वाजे पाऊल आपुले ' या नाटकाचा पहिला अंक करून दाखवला. गजानन भोसल्यांचा ' भास्कर भुस्कुटे ' उत्तम वाटला. ' व्यंकट'च्या भूमिकेत मनो-हर राणे यांनी वास्तवता आणण्याचा प्रयत्न केला. त्या मानाने ' अचाट'ची मिष्किल भूमिका रवि चिंचणकरांना मुळीच जमली नाही. सौ. भाग्यलक्ष्मी खरे या ' सुशिले'च्या भूमिकेत बऱ्या वाटल्या. त्यांच्या कामात सफाई जाणवत होती. मनोहर राणे यांचं दिग्दर्शन ठीक होतं. या एकांकिकेनंतर ' शरण तुला भगवंता' ही श्रीनिवास भणगे यांची एकांकिका देना बँकेने सादर केली. देना बँकेच्या गुणी कलावंतांनी चांगल्या एकांकिकेची निकड का केली नाही कुणास ठाऊक ? पात्रांच्या दुराग्रहापायी विचारा डायरेक्टर ऐन नाटकाच्याच दिवशी कशी हाय खातो हे या एकांकिकेत दाखवून देण्याच्या प्रयत्नात स्वतः लेखकच तोकडा पडला आहे. संवादात चमक नाही, शिवाय पाल्हाळ विनोद असलेल्या या एकांकिकेत पात्रांचा

तरी कोठवर प्रभाव पडणार ? अशोक कुलकर्णी ( डायरेक्टर ), शरद परुळेकर ( रमेश ), आशा केरकर ( गुलाब ) ही पात्रे यथातथाच वाटली. त्यातल्यात्यात भालचंद्र ठाकूर ( लिमये ) व सखाराम माने ( गणू ) काय ती बरी वाटली.

दुसऱ्या दिवशी 'जावईशोध,' 'तीन शहाणे,' 'वेडा गिरिधारी' व पुन्हा 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' अशा चार एकांकिका झाल्या.

'जावईशोध' ही पुरुषोत्तम दारव्हेकरांची एकांकिका बँक ऑफ महाराष्ट्रने करून दाखवली. सुधाकर पाटणकर यांचा 'बबन' आणि सदा गोंधळेकरांचा 'रावसाहेब' ही दोन पात्रे सोडल्यास इतरांच्या अभिनयात संपूर्ण कृत्रिमता जाणवत होती. त्यामुळे पुढे-पुढे ही एकांकिका अतिशय कंटाळवाणी वाटत होती. यानंतर रिझर्व्ह बँकेने, प्रबोध जोशींच्या 'तीन बंदर' या मूळ गुजराती एकांकिके-वरून प्रमिला केळकर यांनी 'तीन शहाणे' ही मराठी अनुवाद केलेली एकांकिका सादर केली. होस्टेलमधल्या खुनाला वाचा फुटून एक आंधळी, एका बहिरा आणि एक मुका या त्रिकुटाची कशी त्रेधातिरपीट उडते व पोलिसात वर्दी देईपर्यंत त्यांना कशी एकमेकांची समजूत घालावी लागते, हे या एकांकिकेत दर्शविले गेले आहे. संवादापेक्षा अभिनयाला महत्व असलेल्या या एकांकिकेत कु. जयश्री बांगर यांचा 'नयना' या आंधळ्या बाईचा अभिनय खरोखरच अप्रतिम असाच होता. मुक्या 'सुभाष'चा अभिनय विभाकर बिवलकर यांनी जितक्या सहजतेने केला, तितक्याच सहजतेने 'श्रवण' या बहिऱ्या माणसाचा अभिनय भास्कर पंडित यांनी केला. एकंदरीत ही एकांकिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली.

महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेने 'वेडा गिरिधारी' ही एकांकिका करून दाखवली. यात अनंत बक्षींनी 'भटजी'ची भूमिका केली. बक्षींचा आपल्या भूमि-केशी एकरूप होण्याचा प्रयत्न प्रामाणिक होता. अनंत रानडे 'गिरिधारी' म्हणून शोभले. तथापी, 'चांदणी'च्या भूमिकेत सौ. कुंदा खानोलकर तोकड्या पडल्या. त्यांचा आवाज देखील किरटा निघत होता. रजनीकांत रोडे 'मल्हारराव'च्या भूमिकेत साधारण वाटले. या एकांकिकेनंतर युनायटेड कमर्शियल बँकेने प्रथमच आंतरबँक नाट्यस्पर्धेत भाग घेऊन 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' ही एकांकिका करून दाखवली. स्टेशन-मास्तरची भूमिका करणारे चंद्रकांत शेटे सोडल्यास इतर पात्रे बरीच कच्ची वाटली. 'मनकर्णिके'ची भूमिका करणाऱ्या सुहासिनी परळकर या तर बोलतांना स्टेजवर अकारण पुढे-मागे धावत होत्या. केव्हा एकदा आपण विंगेत जातो असं त्यांना झाल्यासारखं वाटत होतं.

तिसऱ्या दिवशी 'पांच दिवस,' 'आठ खुर्च्या आणि काळोख,' 'काळोख' 'आणि' ठरवलं ते ठरवलं' अशा चार एकांकिका झाल्या.

पंजाब नॅशनल बँकेने 'पाच दिवस' ही सदानंद रेगे यांची एकांकिका अत्यंत सुंदर रीतीने सादर करुन दाखवली. लष्करातला एक गार्ड शत्रुपक्षातल्या एका

अंत्या बावचळतो. आई म्हणतीया 'आज्ज्याला बोलीव' तर आज्जा म्हणतो 'कशयाला चुलीत घालाया का ?' माणसाला जाळताना त्याने वेशीवरून, मारुतीच्या देवळाआडून चोरून पाहिलेले होते. पण चुलीत माणसाला जाळतात हे मात्र त्याने पाहिले नव्हते. आईने कदाचित त्यासाठीच आज्ज्याला बोलावले असेल म्हणून घावरून तो पळून जात असेल. आपण नव्हता का आई मागे लागली होती एकदा लाकूड घेऊन, तेव्हा धूम ठोकली, तसाच म्हातारा खरडत-खरडत निघाला असेल. आपण बाजूला व्हा कसे, असा विचार करून अंत्याने म्हाताऱ्याची धरलेली काठी सोडली आणि तो परत गल्लीवर आला. जमदाडयाचा मोहन्याबरोबर राजा-राणी खेळू लागला.

म्हातारा बाहेर पडला तसा संत्या रडू लागला. त्याला खरे तर काहीच कळत नव्हते. पण म्हातारा आज्जा संत्याला रोज घेऊन बसायचा. त्यामुळे संत्याला आज्ज्याचा भारी लळा लागला होता. दोन दिवस झाले, संत्याला आज्जा दिसलाच नव्हता. जुलाबाने तो बेजार झाला होता. चिडचिडा झाला होता. सारखा पांघरुण भरवायचा आणि रडत बसायचा. मंजाने घेतले तरी त्याचे रडे थांबत नसे.

आत्ता तर असेच झाले. आज्ज्याच्या आरडाओरडयाने मंजाने संत्याला चहा पाजणे बंद केले. बशी त्याच्या तोंडापुढून बाजूला केली आणि ती म्हाताऱ्याला बोलवायला गेली, तसा संत्या इकडे रडू लागला. मंजा तर पुरी वैतागली होती. सकाळी तिने कुणाचे तोंड पाहिले होते कुणास ठाऊक !

मंजा अंत्याची वाट पाहत बसली. पण अंत्या जो बेंदूलात रंगला तो रंगलाच ! तिकडे म्हातारा जो निघाला तो ताडताड् पावले टाकीत वेशीवरच्या मारुतीच्या देवळात येऊन बसला. काठी बाजूला पडली होती. रागाने शरीराची उलघाल होत होती. खांबाला टेकून बसल्याबसल्या मध्येच तो पचकन थुंकत होता. आणि हनवटीला हात लावून डोळे मिटून घेत होता. मिटल्या डोळयांपुढे मघाशी मंजाने पितळीत दिलेला चहा त्याला दिसत होता ! पण परत तो डोळे उघडायचा आणि एक घुटका गिळून पचकन् थुंकायचा व स्वतःशीच झाड करकरावं तसा बडबडायचा. मंजाला शिव्या घालायचा.

दिवस कासराभर वर आला तरी म्हातारा तसाच बसून होता. त्याला वाटले होते कोणीतरी आपल्याला बघायला येईल. पण तसे काही झाले नाही. देवळाकडे कुणीच आले नाही आणि खांबाला टेकून बसलेला म्हातारा डोक्याचा फाटून विटका झालेला पटका उशयाला घेऊन लवंडला.

पोटात काही नसताना झोप लागणे शक्य नव्हते. तरीसुद्धा म्हातारा डोळे मिटून गप्प पडून राहिला होता. मनातून मात्र तो स्वतःवर चिडला होता.

"घेतला असता दिला तेवढा च्या, तर काय मरत व्हतो आपण." पण आपण म्हणजी पांडया लव्हाराचे गाढावच जणू. अडेलतट्टूपणा केला. दाणकन् पितळी

आपटली. सगळा नासवला. ना म्हटाला ना पोटाला. तरी पण काय बी झालं तरी तरी घरी जायचं नाही. काय म्हणून मी मंजाचं ऐकावं ? म्हातारा झालोय. कष्ट करून लेकाला लहानाचा मोठा बापई केला. त्याला सांभाळायला. काय धाड भरलीया कामाला जा म्हणून सांगायला, घोडा लहान का हायी आता ?—आता जात नाय त्याला मी तरी काय करणार ? माझं डोंबलं ? मरून दी की तिकडं. काय करायचंय मला—म्या मात्तर साफ जाणार नाही' म्हातारा स्वतःशीच कराकरा दाढी खाजवीत मनातल्या मनात बडबडत होता. 'मंजानं पितळी भरून च्या दिल्याबिगार देवाळ सोडायचं नाय. बघू कोण हारतया, ती का म्या ?'

म्हातारा भारी हेकेखोर स्वभावाचा, पहिल्यापासून तसाच. बायकोला तर त्याने किती वेळा ह्या असल्या स्वभावासाठी मारले होते. गावात ह्याची भांडणे पेटायची ती असल्या तिरसट आणि हेकेखोर स्वभावापायी, जत्रेत तर त्याने एकदा ही धम्मालच केली !

तमाशातल्या बाईला 'माझ्या राजसा माझ्या मव्हना माझं ऐकाल का, मला कुकू लावाल का ?' ही लावणी म्हणायला सांगितली. ती ऐकेना. त्याने खिशातले पाच रुपये काढले. तरी बाई ताठच ! मग म्हातारा खवळला बाईनं दुसरीच लावणी म्हणायला सुरूवात केली, तेव्हा तर म्हाताऱ्याचे टाळके पार बिघडले. त्याने बाईला नाच बंद करायला लावला.

पब्लिक बोंब मारायला लागले. आणि एक-दोघे त्याच्यावर धावले. आणि मग म्हाताऱ्याने सडकून मार खाल्ला ! चार रोज अंग शेकून घेत होता. असा हा विचित्र स्वभावाचा म्हातारा एखादी गोष्ट करायची म्हटली की कशाकडे न बघता करत सुटेल. आणि नाही म्हटले की काही झाले तरी तिकडे डोळे वर करूनसुद्धा बघणार नाही.

देवळात पडल्यापडल्या म्हाताऱ्याच्या डोळ्यापुढे अंधाऱ्या येऊ लागल्या. दिवस चांगला माथ्यावर आला होता. पण अजून त्याला बोलवायला कुणीच आले नव्हते. मध्येच झाकलेले डोळे उघडून कुणी येतंय का म्हणून पाहायचा आणि उन्हाच्या झळा दिसल्या की गप्पकन विजेच्या दिव्यागत डोळे मिटून घ्यायचा.

घरी असता तर म्हातारा दोन वेळा जेवला असता. पण आज सकाळपासून चहाचे पाणी पाहूनसुद्धा त्याच्या पोटात ते गेले नव्हते. आणि भाकरीचा तर पत्ताच नव्हता !

दिवस चांगलाच ढळू लागला. दोन वेळा म्हातारा देवळातून उठला. निघालासुद्धा, पण त्याच्या तिरसट स्वभावाने उचल खाल्ली. पुढे निघालेला म्हातारा रुसून माघारी फिरला. आणि हातपाय पसरून पडून राहिला. आणि भुकेने व्याकूळ झालेल्या म्हाताऱ्याला कधी झोप लागली ते कळलेसुद्धा नाही.

म्हातारा भानावर आला तोच मुळी अंत्याच्या आवाजाने. आपण किती वेळ

झोपलो ते त्याच्या ध्यानात आले नाही. मनगटाने चिपाडलेले डोळे पुसत म्हाताऱ्याने आळस दिला. आणि धोतराने तोंड पुसत अंत्याकडे पाहत त्याने विचारले, "काय रं ?"

"आज्ज्या–संत्या कसनुसा करतुया !" नाकातील नळी वर ओढत अंत्या घाबऱ्याघाबऱ्या म्हणाला. त्याला पळत आल्यामुळे धाप गली होती.


म्हाताऱ्याला नीट ऐकू आले नाही, त्याने कानामागे उजवा हात नेला आणि नातवापुढे मोठ्याने ओरडत तो म्हणाला, "मोठ्यानं बोल, मला काही ऐकू आलं नाही."

"आरं, संत्या कसनुसा करतोय, आई रडतीया !" अंत्याचा चेहरा रडका झाला.

"आ ?" आश्चर्याने म्हाताऱ्याच्या तोंडावरच्या सुरकुत्या रुंदावल्या.

"चल ना आज्ज्या––संत्या डोळं पांढरं करून पडलाय ! बाप कुठं गेलाय म्हना ठाव नाय" रडतच अंत्या म्हणाला.

"चल."बाजूला उभी केलेली काठी हातात घेत म्हातारा अंत्याबरोबर निघाला. सकाळपासून मनात धरलेला हट्टीपणा त्याने सोडला होता. आणि नातवाच्या प्रेमाखातर तो झपाझप पावले टाकीत अंत्यामागोमाग चालू लागला होता. सकाळचा झालेला प्रकार विसरून, आपला हट्टीपणा मागे सारून...



# पुस्तके

ओंकार

# नायिका नसलेली नायिकाप्रधान कादंबरी

**वि. शं. पारगावकर**

'ओंकार' ही प्रा. भीमराव कुलकर्णी यांची पहिली ऐतिहासिक कादंबरी. रघुनाथराव आणि आनंदीबाई पेशवे यांच्या जीवनावर लिहिलेली. विशेषतः आनंदीबाईच्या जीवनाचा पट उलगडून दाखविणारी. कादंबरीची सुरुवात 'आनंदी'-बाईच्या नामकरणापासूनच होते आणि शेवट तिच्या मृत्यूने होतो.

'... मोठी भाग्यवान ! एकादशीच्या दिवशी गेली ...' या अगदी साध्या, सरळ, परंतु तितक्याच परिणामकारक वाक्याने.

मराठीत ऐतिहासिक कादंबरीचे दुसरे 'युग' रणजित देसाई यांच्या 'स्वामी'-पासून सुरू झाले. 'स्वामी'ने अमाप लोकप्रियता मिळविली. मान्यवरांकडून आणि रसिकजनांकडूनही. माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील ही कादंबरी महाराष्ट्री-यांच्या मनात घर करून बसलेली आहे.

'ओंकार' ही त्याच कालखंडातील इतिहासावर आधारलेली कादंबरी आहे. तिच्यातही नानासाहेब पेशवे, पार्वतीबाई, गोपिकाबाई, विश्वासराव, सदाशिवराव-भाऊ, माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, नाना फडणीस, रमाबाई आणि आनंदी-बाई इत्यादी सर्व ऐतिहासिक व्यक्ती आहेत. 'स्वामी' ही कादंबरी माधवराव पेशवे यांच्या जीवनाबरोबरच संपते आणि 'ओंकार' आनंदीबाई यांच्या जीवना-बरोबर संपते. आनंदीबाईचे दुसरे नाव 'ओंकार'. आणि तेच नाव या ऐतिहासिक कादंबरीला देण्यात आले आहे; म्हणजे ही कादंबरी नायिकाप्रधान आहे आणि तिची नायिका आनंदीबाई आहे. 'स्वामी'चा नायक माधवराव पेशवे हा आहे.

**ओंकार—प्रा. भीमराव कुलकर्णी—दत्त प्रकाशन-मूल्य दहा रुपये.**

या दोन कादंबऱ्यांची वास्तविक येथे तुलना करण्याची आवश्यकता नाही. आणि 'ओंकार'विषयी लिहीत असताना मी 'स्वामी'वर तिचे निकष जोखणार नाही. कोणत्याही कलाकृतीचे रसग्रहण हे तुलनेवर आधारलेले असता उपयोगी नाही. कारण, कलाकृती ही एक अतिशय स्वतंत्र वस्तू असते. एका कलाकृतीचा तोंडवळा क्वचित-प्रसंगी दुसरीसारखा असू शकेल, परंतु हा सारखेपणा रसग्रहणातील मूलभूत घटक होऊ शकणार नाही. पण एखाद्या कलाकृतीच्या बाबतीत हा घटकच जर प्रमुख होऊ पाहत असेल तर मग ती वस्तू कलाकृती म्हणून उरणार नाही. तुलनेचा हा घटक सामाजिक कादंबरीपेक्षा ऐतिहासिक कादंबरीत अधिक प्रकर्षाने डोकावण्याचा धोका असतो. कारण, अशा कलाकृतीतील कथावस्तू हा इतिहासातील एक भाग असतो. इतिहासातील काही घटना या अगदी अपरिवर्तनीय असतात, तेव्हा अशा अपरिवर्तनीय घटना जर अनेक कलाकृतींचा विषय होत असतील तर तेथे वाचकांच्या, रसिकांच्या आणि समीक्षकांच्यादेखील मनात तुलनेचा विचार येणे अपरिहार्य असते.

श्री. भीमराव कुलकर्णी यांच्या 'ओंकार' या कादंबरीच्या बाबतीत नेमके तेच झाले आहे.

लेखकाला ऐतिहासिक कादंबरीची काही पथ्ये सांभाळावी लागतात. ही पथ्ये कित्येक वेळा त्याला फार अडचणीत टाकतात. कित्येक वेळा ती अतिशय सोयी-चीही असतात. या पथ्यांपैकी मुख्य म्हणजे त्याला इतिहासाशी फार प्रामाणिक राहावे लागते. आता इतिहासाशी प्रामाणिक राहणे म्हणजे काय? या प्रामाणिक राहण्यात अनेक गोष्टी येतात. पहिली, आपल्या कथावस्तूसाठी निवडलेला इति-हासातील कालखंड. हा कालखंड कथावस्तूची पार्श्वभूमी ठरवीत असतो आणि हा कालखंड म्हणजे तेव्हाच्या (ऐतिहासिक) काळाची केवळ लांबी-रुंदी नसतो, तर त्यात अनेक गोष्टी समाविष्ट असतात. तेव्हाची सामाजिक, धार्मिक, राजकीय, भाषिक आणि नीतिमूल्यविषयक परिस्थिती. मनुष्यमात्राचा पिंड या सर्व घटकां-तूनच पोसला जात असतो, म्हणून त्या वेळचे मानवी जीवन आणि जीवनधर्म एका विशिष्ट चेहऱ्यामोहऱ्याचा असतो.

ऐतिहासिक कादंबरी ही खऱ्याखुऱ्या अर्थाने राजकीय कादंबरीच असते! परंतु ते भूतकाळातील राजकारण म्हणून आजच्या काळातील इतिहास असतो. ज्या व्यक्तिजीवनाला अथवा जीवनांना मध्यबिंदू कल्पून ही कादंबरी लिहिलेली असते, ते व्यक्तिजीवन प्रामुख्याने राजकीय असते. 'ओंकार' या कादंबरीतील प्रमुख जीवन (मध्यबिंदू म्हणून उपयोगात आणलेले) हे आनंदीबाई आणि रघुनाथराव यांचे आहे. परंतु भीमराव यांच्या 'ओंकार'मधील या जीवनाचा मध्यबिंदू अनेक वेळा ढळलेला आढळतो. या कादंबरीतील हा एक प्रमुख दोष म्हणावा लागेल. 'ओंकार' हे नाव कादंबरीचे आणि आनंदीबाईचेही. परंतु खऱ्या अर्थाने ही नायिकाप्रधान कादंबरी होऊ शकलेली नाही. शिवाय ज्या कालखंडातील ही कथा-

वस्तू प्रा. भीमराव यांनी निवडलेली आहे, त्या कालखंडातील तीन-चतुर्थांश भाग माधवराव पेशवे यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेला-मंतरलेला आहे. हे ऐतिहासिक सत्य आहे, तसेच ते अविवाद्य सत्यही आहे. तेव्हा मग लेखकाने कितीही प्रयत्न केला तरी 'ओंकार' या कादंबरीचा आस माधवरावाभोवतीच फिरत राहतो. वास्तविक, हे अपरिहार्य नाही. कारण, त्या कालखंडातील आनंदीबाई ही व्यक्ती प्रमुख जरी नसली तरी महत्त्वाची निश्चितच आहे. माधवरावांच्या मृत्यूनंतर जवळजवळ रघुनाथराव पेशवे यांच्याकडेच पेशवाईची सूत्रे प्रामुख्याने आलेली असतात. शिवाय नारायणरावांचा खून होतो त्याला जबाबदारही 'आनंदीबाई' आणि रघुनाथरावच आहेत. आणि शेवटचे बारभाईंचे राजकारणदेखील मुख्य शत्रू रघुनाथराव आणि आनंदीबाई यांना कल्पूनच चाललेले असते! रघुनाथराव पेशवा हा असामान्य योद्धा होता. खुद्द माधवराव पेशवे यांच्या अल्पमुदतीच्या काळातदेखील रघुनाथरावांची कामगिरी फार महत्त्वाची गणली गेलेली आहे. रघुनाथरावांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे मन हे अतिशय गुंतागुंतीचे, विवाद्य, स्वैर आणि दिलदारही आहे. तसेच आनंदीबाई ही त्या काळातील गोपिकाबाईंनंतरची बुद्धिमान बाई.

परंतु इतिहासात मात्र या बाईला रघुनाथरावांपेक्षा अधिक तर नाहीच, परंतु त्यांच्याइतकेदेखील महत्त्व देता येईल, असे मला वाटत नाही. 'नारायणरावांचा खून' ही घटना सोडली (इतिहासात तीही वादग्रस्त आहे) तर आनंदीबाईची काही कर्तबगारी इतिहासाच्या त्या कालखंडात दिसत नाही. पेशवाईतील धाकट्या पातीमधील कर्तबगार व्यक्ती म्हणजे रघुनाथराव पेशवा हीच होय!

म्हणजे थोरल्या पातीतील गोपिकाबाई आणि माधवराव आणि धाकट्या पातीतील रघुनाथराव; तसेच नारायणरावांच्या वधानंतर 'नाना' असे हे या कालखंडातील जीवनाचे प्रमुख घटक आहेत. त्यांत आनंदीबाईंना पुढच्या रांगेत स्थान मिळते ते नारायणरावांच्या वधाच्या वेळी आणि नंतर काही काळ!

अशी ही त्या कालखंडातील राजकारणामधील तिय्यम स्थान असलेली 'स्त्री' भीमराव यांनी आपल्या कादंबरीची नायिका केलेली आहे. त्यामुळे 'ओंकार' या कादंबरीत आनंदीबाईंना अव्वल स्त्रीचे महत्त्व कधीच मिळत नाही! लक्षात राहते ते व्यक्तिमत्त्व रघुनाथरावांचे; परंतु तेही कादंबरीभर नव्हे. पण तरीही भीमराव यांच्या लेखणीने रघुनाथराव यांचे व्यक्तिचित्र उत्तम उभे केले आहे, यात शंका नाही. इतिहासातील मूळ स्वभावरेखा लक्षात घेऊन त्यांनी अनेक लहानमोठे प्रसंग या रघुनाथरावांभोवती असे उभे केले आहेत की, त्यामुळे रघुनाथरावांच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व लाभलेले आहे. ही या कादंबरीतील यशाची प्रमुख बाजू. तसेच गोपिकाबाईची व्यक्तिरेखादेखील वाचकांच्या दीर्घकाळ लक्षात राहावी एवढी परिणामकारकतेने रंगविलेली आहे.

ही कादंबरी दुसऱ्या एका बाबतीत यशस्वी झालेली आहे. ती म्हणजे इतिहासाचा

तो कालखंड—मी वर म्हटले त्याप्रमाणे राजकीय, सामाजिक, भाषिक, धार्मिक आणि नीतिमूल्यविषयक—प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी खूपच यशस्वी रीतीने उभा केलेला आहे. वाचकाला सुखेनैव त्या काळात नेऊन पोचविण्याचे सामर्थ्य या कादंबरीत निश्चित आहे. कित्येक ठिकाणी तर त्यांनी केलेले निवेदन अतिशय समर्पक आणि परिणामकारक आहे; परंतु अनेक ठिकाणी ' ओंकार 'च्या निवेदनात भेसळ झालेली आढळते. निवेदनाची एक विशिष्ट भाषा घेऊन आलेले भीमराव काही ठिकाणी निवेदनात आधुनिकता आणतात तर काही ठिकाणी पात्रांच्या तोंडी शोभणारी भाषा निवेदनाची भाषा बनते आणि रसहानी होते. उदाहरणार्थ, (पान ३१४ वर) लेखकाच्या निवेदनातील एक वाक्य असे, " लक्ष्मणभट्ट मध्ये बोलावयास गेले असता बाईस राग आला तो ईश्वर जाणे. "

तसेच पात्रांच्या संभाषणामध्ये एखादा अर्थहीन शब्द उगीचच आणला जातो त्यामुळे रसहानी होते. उदा. पान २८७ वर " श्रीमंतानी गतगोष्टींच्या कल्पनेने व्यर्थ होऊ नये. " या व्यतिरिक्त निवेदनामध्ये अनवधानाने वापरल्या गेलेल्या शब्दांपैकी एक (पान २७६) " आतापर्यंत अशा रीतीने संन्यास घेण्याच्या धमक्या मी थोड्या का पाहिल्या आहेत ! " धमक्या ऐकू येत असतात, दिसत नसतात ! आणखी पान १६९ वर आनंदीबाईंच्या तोंडी ' बंगला ' हा शब्द आलेला आहे, तो असाच खटकतो.

परंतु कित्येक ठिकाणी काही भावनांचा परिपोषही फार परिणामकारकरीत्या झालेला आढळतो. पान १७० वर दादासाहेबांच्या मनातील गतकालविषयीचे विचार या कादंबरीची खोली वाढवितात. तसेच गोपिकाबाईंचे शेवटचे दिवस व त्या दिवसातील तिची अवस्था याचे वर्णन परिणामकारक आहे. पान १६६ वर आनंदीबाई आपल्या नवऱ्याच्या स्वभावाविषयी म्हणते, "...स्वयंवरातील पतिवरेची बुद्धी क्षणाक्षणाला नव्या-नव्या भूत्यांवर बसत जाते, त्याप्रकारे यांच्या मनाचे खेळ असेच रोज नित्य नवे रूप धारण करीत राहणार का ? "

' ओंकार ' या कादंबरीत ग्रथित झालेला इतिहास व ऐतिहासिक व्यक्तींची, त्या व्यक्तींच्या महत्त्वाच्या दृष्टीने त्यांची क्रमवारी वर दिलेलीच आहे. त्या इतिहासातील क्रमवारीनुसार आनंदीबाई हे एक तिय्यम दर्जाचे व्यक्तिचित्र आहे असेही विधान मी वर केलेले आहे. आणि ऐतिहासिक कादंबरीत या व्यक्तिचित्राला नायिकेचा दर्जा मिळण्यासारखा नाही हेही मी स्पष्ट केलेले आहे. परंतु तरीही कलावंताला ऐतिहासिक सत्य सांभाळून देखील या आनंदीबाईला नायिकेचा दर्जा मिळवून देण्याचा अधिकार आहे असे मी समजतो; परंतु येथे प्रा. भीमराव कुलकर्णी यांना आपल्या कादंबरीमध्ये आनंदीबाईला तसा दर्जा मिळवून देता आला नाही.

ऐतिहासिक घटनेवर जेव्हा एखादी कलाकृती निर्माण होते तेव्हा कलावंताला त्याच्या दृष्टिकोनातून इतिहास पाहण्याचे आणि आपल्या कलाकृतिद्वारा तसे दर्शन

घडविण्याचे स्वातंत्र्य असते. येथे भीमराव कुलकर्णी आपल्या दृष्टिकोनातून वाचकांना आनंदीबाईचे दर्शन घडवू शकले असते. सर्व ऐतिहासिक घटनांच्या क्रिया-प्रतिक्रिया आनंदीबाईच्या मनात परावर्तित करून त्यांना आनंदीबाईची महत्त्वाकांक्षा, तिचे दुःख, तिची असहाय्यता, तिचा उद्वेग, तिचे प्राक्तन, इतिहासाशी व वस्तुस्थितीशी असलेल्या तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या नात्यांतून द्वंद्व निर्माण करता आले असते. तिच्या नवऱ्याचे महान व्यक्तिमत्त्व आहे. त्याच्या अंगी असलेले महान दोष यांच्या क्रिया-प्रतिक्रियांनी लेखकाला आनंदीबाईचे व्यक्तिमत्त्व नायिकेच्या दर्जाप्रत नेण्याइतके महत्त्वपूर्ण निश्चित करता आले असते. त्या कालखंडाच्या इतिहासातून नियतीने आपल्या खेळात टाकलेले अनेक डाव पेशव्यांच्या इतिहासावर जसे उलटतात तितक्याच क्रूरपणे किंबहुना थोडे अधिकच ते आनंदीबाईच्या अवघ्या जीवनावरही उलटतात. या डावांच्या उभ्या-आडव्या पाशांत गुंतून पडलेले आनंदीबाईचे जीवन मग असहाय्य असूनदेखील इतके अर्थपूर्ण झाले असते की, मग तिचा मृत्यू तिचा सखा झाला असता आणि, ' मोठी भाग्यवान ! एकादशीच्या दिवशी गेली...' या शेवटच्या वाक्याला अर्थाची भरघोस फळे लगडली असती.

अशा सर्व गुणदोषांसकट ही कादंबरी वाचनीय आणि अभ्यासनीयही आहे. कारण उत्तम ऐतिहासिक कादंबरी कशी असावी, हे जसे ही कादंबरी सांगते, तसेच यशस्वी ऐतिहासिक कादंबरी लिहिण्यात काय धोके असतात हेही ती सांगते. ■■






लेखक ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक । । । । । । । । । पंधरा

थाग-ला प्रदेशाची टेहळणी करून मी लुंपूला परत आलो तो कालखंड म्हणजे भारत-चीन युद्धाच्या नाटकाच्या दुसऱ्या अंकाची सुरुवात होती. आपले वरिष्ठ लष्करी अधिकारी योजना आखण्यात गर्क होते. भारतीय लष्कराच्या तुकड्या पुढे पाठवल्या जात होत्या. त्यांची तयारी होत होती. आघाडीवर त्याच कालखंडात प्रत्यक्ष परिस्थिती कशी होती, याचे आता मी थोडक्यात वर्णन करतो.

धोला या आपल्या ठिकाणाची आपण सुटका केली होती. चिनी सैनिकांचा धोलावरचा वेढा आता उठला होता. धोला आपल्या कबजात होते. धोला या ठिकाणावरच्या जवानांचा भारतीय लष्कराशी संपर्क होता. आपल्या ९/ पंजाब या तुकडीतले जवान नामका-चू नदीपर्यंत पोचून चिन्यांच्या समोर उभे ठाकले होते. पूल क्रमांक १ ते ४ जवळ उभ्या असलेल्या आपल्या जवानांची मुख्य कामे तीन होती. पहिले काम हे होते की, धोला या ठिकाणी असलेल्या आपल्या जवानांचे नीतिधैर्य 'काळजी करू नका, आम्ही तुमच्या मागेच उभे आहोत' अशा अर्थाने

वाढवणे. दुसरे म्हणजे चिन्यांना भारतीय प्रदेशात आणखी पुढे येऊ न देणे आणि तिसरे म्हणजे आता जी काही थाग-ला प्रदेशातली जमीन चिन्यांनी ' भारतीय प्रदेश ' म्हणून सोडली होती ती वाचवणे ! (वस्तुत: या वेळीदेखील चिनी सैनिक ज्या प्रदेशात उभे होते तीदेखील भारतीय भूमीच होती.) नामका-चू नदी ही आता लष्करी सरहद्द बनली होती. एका नदीच्या अल्याडपल्याड भारत आणि चीन या दोन बलाढ्य राष्ट्रांच्या सेना समोरासमोर उभ्या होत्या. दोघांच्या मधून अरुंद पात्राची नामका-चू नदी नेहमीप्रमाणे संथपणे वाहत जात होती. खळखळाट करीत वाहणारे ते पाणी जणू काही भयभीत होऊन भारतीय जवानांना सांगत होते की, ' तुझ्या रक्ताने माझा रंग ' लाल ' होणार आहे याचं वाईट वाटतंय रे ! ' दोन्ही तीरांवर उभ्या असलेल्या भारत आणि चीन यांच्या सैनिकांच्या मनोवृत्तीत किती तरी पटीने फरक होता. चिनी सैनिक आणि चिनी सरकार यांच्यात भावनात्मक एकात्मता होती; तर भारतीय जवान आणि भारत सरकार यांच्यांत चांगलाच दुरावा होता. चिनी सरकारने चिनी सैनिकांना आदेश दिला असला पाहिजे की, राजकीय पातळीवरून भारत सरकारला आम्ही चांगलंच फसवलंय. आता लष्करी पातळीवरून भारताच्या सीध्या-साध्या जवानांच्या मनात तुम्ही गोंधळ माजवून देऊन त्यांनाच फसवा. म्हणूनच काय केलं चिनी लष्करी अधिकाऱ्यांनी ? भारतीय प्रदेशाकडे तोंड असलेले दूरध्वनिक्षेपक बसवले. ता. २० सप्टेंबरलाच चिन्यांनी बंदुकीचा चाप ओढून भारतीय ताकद अजमावली होती. दोन्ही बाजूंकडचे सैनिक चांगलेच जखमी झाले होते. आता गोळीबार तात्पुरता थांबवून चिनी सैनिक भारतीय जवानांचे नीतिधैर्य खच्ची करण्याच्या मागे लागले. दूरध्वनिक्षेपकावरून अस्खलित हिंदीत भारतीय जवानांना उद्देशून चिनी सैनिक सांगू लागले,

" तुमचा काहीतरी गैरसमज होतोय ! तुम्ही आणि आम्ही, चिनी जनता आणि भारतीय जनता यांचं काहीही भांडण नाही. आपली मैत्री अतूट आहे. लवकरच भारत सरकार आणि चीन सरकार वाटाघाटी करून हा सरहद्दीचा प्रश्न सोडवणार आहेत. वाटाघाटी जवळ येऊन ठेपलेल्या असताना तुम्ही बंदुका उचलणं ठीक नव्हे ! "

झालं ! सीधा-साधा भारतीय जवान गोंधळला. त्याला वाटले, चिनी सांगताहेत ते कदाचित खरेही असेल; कारण शांततापूर्ण वाटाघाटी आणि भारत सरकार यांचा संबंध अतूट आहे. अगदी जवळून चिन्यांनी भारतीय जवानांना नितिभ्रष्ट केले—खरं सांगायचं तर चिन्यांनी आपल्या जवानांना नितिभ्रष्ट केले नाही. त्यांना ते नितिभ्रष्ट करू शकले याला जबाबदार होते भारत सरकार ! कारण, आमच्या पवित्र भूमीच्या प्रश्नाच्या बाबतीत आमचे भारत सरकार वाटाघाटी करणे शक्यच नाही, अशी आपल्या जवानांना खात्री नव्हती. उलट खात्री ही होती की, आपले भारत सरकार ना ? मग नक्कीच शांततापूर्ण वाटाघाटी ! आपल्या जवानांचा

असा समज होण्यात त्यांची चूक नव्हती. कारण, त्याचा अनुभवच हा होता की, स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत सरकारला लढाईपेक्षा शांततापूर्ण वाटाघाटींचेच प्रेम जास्त आहे. आपल्याला हे जमले नसते ? अस्खलित चिनी भाषेत बोलू शकणारी माणसे आपल्याकडे का नव्हती ? आपण देखील लाऊडस्पीकरवरून चिनी भाषेत बोलून त्यांच्या सैनिकांच्या मनात गोंधळ निर्माण का नाही करून देऊ शकलो ? कारण नेहमीचंच ! भारत सरकार समजत होतं; चीनला युद्ध नको आहे. आम्हा आघाडीवरच्या कमांडर्सची पंचाईत झाली. तिकडून दररोज हिन्दीत व्याख्यानबाजी होते आहे. सारखेसारखे तेच ऐकून आपल्या जवानांचा त्यांच्यावर विश्वास बसतोय. पुढे पुढे तर या ध्वनिक्षेपकांच्या युद्धाला जोर चढला. कारण, ता. १ ऑक्टोबर, १९६२ ला चीनने त्यांचा 'राष्ट्रीय दिवस' साजरा केला. या समारंभाला चीनमधले भारताचे वकील आपल्या लवाजम्यासह पेकिंगमध्ये हजर राहिले आणि त्यांनी मंडपास शोभा आणली ! भारतीय जवान या बातमीने आणखीनच गोंधळले. आता काय ? नक्कीच वाटाघाटी होणार ! त्याशिवाय का भारताचे वकील पेकिंगमधल्या समारंभाला हजर राहिले ? शत्रुराष्ट्रांत जीवघेणा गोळीबार आणि राजकीय सोपस्कार या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडत नसतात. दोन राष्ट्रांचे संबंध बिघडले याचा अर्थ दोघांचे राजकारण बिघडले असाच असतो. आणि त्याच वेळी इकडे परराष्ट्र खात्याच्या मंत्रालयातले नबाब मात्र, सैनिकांनी आम्ही सांगू ती कामं करायची असतात, नाहीतर मरायचं असतं.' असा हुकूम का दिलात हे सैनिकांनी कधी विचारायचं नसतं, हे घोषवाक्य लक्षात ठेवून हुकूम सोडीत होते ! सरकारच्या या एकेक 'आयडिया' बघून आमची करमणूक होत होती. पण किती केविलवाणी करमणूक होती ती ! चिनी तिकडून लाऊडस्पीकर-वरून सांगतच होते, भारतीय जवानांनो ! तुमची आणि आमची मैत्री शाश्वत आहे. लवकरच वाटाघाटी होऊन सरहद्दीचा हा मामुली प्रश्न सुटणार आहे. उगाच गोळीबार करून शांततापूर्ण वाटाघाटींसाठी निर्माण झालेले वातावरण बिघडवू नका, कधी कधी चिनी मोठ्या आवाजात ओरडून लाऊड स्पीकरवरून विचारत असत की 'तुम्ही नामका-चू नदीच्या परिसरात आलातच का ? थाग-ला रीज. हा प्रदेश चीनचा आहे. साधीभोळी माणसे प्रचाराने फसतात. आपल्याकडून या प्रचाराला जबाब दिला जात नव्हता. त्यामुळे तेच तेच ऐकून आपल्या भोळ्या जवानांच्या मनात संशय पिशाच्याने घर केले. त्यांना वाटले, कदाचित आपण उभे आहोत तो प्रदेश चीनचा असेल देखील. लढाईपूर्वी भारतीय जवानांची मानसिक स्थिती ही अशी होती.

कधी कधी तर चिनी आपल्या जवानांची गंमतच करायचे. लाऊडस्पीकरवरून ओरडून ते सांगायचे की, 'आम्ही चीनच्या हद्दीतलं एक मोठं झाड पाडण्याच्या विचारात आहोत. तेव्हा जर का झाड पडताना मोठा कडकडाट ऐकलात तर

उगाच संतप्त होऊ नका.' काय हा चिन्यांचा दिलदार स्वभाव! या हास्यास्पद वातावरणात लढाईसाठी आवश्यक असलेले वातावरण टिकवून धरणे आम्हाला कठीण जात होते. जगाच्या युद्धाच्या इतिहासात प्रथमच हे घडत होते, की अवघ्या ४० फूट अंतरावर दोन्ही राष्ट्रांचे सैनिक समोरासमोर उभे आहेत. लढाई अशी अजून पुकारलेली नाही. उभयपक्षी अचानक गोळीबार होतो तर एरव्ही दोन्ही पक्ष गप्पा मारताना आढळतात. वाटाघाटी होण्याची शक्यता नाहीच, असेही नाही; कारण दोन्ही राष्ट्रांचे राजनैतिक संबंध अजून मैत्रीचेच आहेत. आणि तरीदेखील दोन्ही बाजूंकडचे सैनिक एकमेकांवर बंदुका रोखून समोरासमोर उभे आहेत.

सरतेशेवटी हेड क्वार्टर ईस्टर्न कमांड आणि हेड क्वार्टर 33rd कोअर हे जवानांची कशीही जमवाजमव करून आघाडीवर एक ब्रिगेड पाठवण्यात यशस्वी ठरले होते. पण खऱ्या लष्करी अर्थाने ती ब्रिगेड नव्हती. गालिचा आणि गोधडी यांतला फरक काय वेगळा सांगायला पाहिजे? १९/ गुरखाज आणि २/ राजपूत या तुकड्या 'वापरायला' (To use) आर्मी हेडक्वार्टरने परवानगी दिली होती. आणि घाईगर्दीने 'लवकर पुढे जा!' असा हुकूम फर्मावून त्यांना आघाडीवर पाठवले गेले होते. इतर मिळतील त्या अनेक जवानांना ७ व्या पायदळ तुकडीला जाऊन मिळण्याचा हुकूम दिला गेला होता. आघाडीवर येत असताना त्यांचे सामान वाहून नेण्यासाठी हमाल नव्हते. वाटेत त्यांना अनंत अडचणी आल्या. हे जवान आघाडीवर आले तेव्हा त्यांच्याजवळ शस्त्रास्त्रेच नव्हती. नुसतेच आलेले आणि आले ते देखील दमून आलेले. अशा तऱ्हेने वेगवेगळ्या तुकड्यातल्या एकत्र केल्या गेलेल्या तुकडीला नाव दिले गेले होते '७ वी पायदळ तुकडी!' कारण, काहीही करून आपल्या ताकदीचा देखावा आघाडीवर निर्माण करायचा होता. या तथाकथित ७ व्या पायदळ तुकडीतल्या जवानांचा एकमेकांशी कधी संबंध आला नव्हता. त्यांना एकाच वेळी कधी लढाईचे शिक्षण दिले गेले नव्हते, त्यांची एकमेकांशी ओळखदेखील नव्हती. सर्वसाधारणपणे जवानांची एकच एक एकसंध तुकडी निर्माण करण्यासाठी त्यांना काही महिने एकत्र शिक्षण द्यावे लागते तरच त्यांच्यांत परस्परांवर पूर्ण विश्वास आणि आपुलकी निर्माण होते. आयत्या वेळी तीन वेगवेगळ्या बटालियन्समधले मिळतील ते जवान एकत्र करून कधी लढाऊ ब्रिगेड तयार होत नसते. ती ब्रिगेड आहे, असा फक्त भास निर्माण करता येतो! मी या घटनेचा उल्लेख अशासाठी केला की, जनरल कौल यांनी मोठ्या थाटानं आपल्या पुस्तकात असा कांगावा केलाय की, "जर का ७ व्या पायदळ तुकडीची लढण्याची आवश्यक ती तयारी झाली नसेल तर त्याला जबाबदार त्या तुकडीचा कमांडर आहे. ब्रिगेडिअर दळवींकडून—७ व्या पायदळ तुकडीचा कमांडर म्हणून—या बाबतीत एक्सप्लनेशन मागवलं पाहिजे!" कमाल आहे की नाही? ७ व्या पायदळ तुकडीचे जवान

आणि अधिकारी 'आमची तयारी उत्तम आहे. आम्ही चिन्यांना हुसकून देऊ शकतो,' असे कधीच म्हणाले नव्हते. कमांडच्या हाताखाली कुणी लढायचे हे कमांडर स्वत:च कधी ठरवत नसतो हे सामान्य ज्ञान आहे. जवानांना लढण्यासाठी आघाडीवर पाठवण्यापूर्वी आपल्या तुकडीची जडण-घडण कशी आहे, हे अभ्यासणे एवढेच फक्त ब्रिगेडिअरचे कर्तव्य असते. 'हे जवान माझ्या तुकडीत नकोत!' असे ब्रिगेडिअर कधी म्हणू शकत नाही. त्याने तसे म्हटले तर तो ब्रिगेडिअरच नव्हे. ७-व्या पायदळ तुकडीची तयारी कितपत होती, याची चर्चा लढाई हरल्यानंतर फार उशिराने करण्यात काय अर्थ आहे? जनरल कौल यांच्याच आधिपत्याखाली असलेल्या जनरल स्टाफ ब्रँचनेच जनानांची कुठंतरी आणि कशीही जमवाजमव करून ७ वी पायदळ तुकडी घाईघाईने 'तयार' केली होती. आपल्याला मुलगा असणे आणि आयत्यावेळी प्रसंग साजरा करण्यासाठी कुठलाही मिळेल तो मुलगा मांडीवर घेणे यांत फार फरक आहे. जनरल कौल, ७ व्या पायदळ तुकडीची निर्मिती ही अशी का होती, याचे एक्सप्लनेशन आधी तुम्हीच द्या! आणि मग दळवींकडून एक्सप्लनेशन मागवण्याच्या गोष्टी करा. आपल्या दोषांचे खापर ७ व्या पायदळ तुकडीच्या जवानांच्या आणि अधिकाऱ्यांच्या डोक्यावर फोडून स्वत: नामानिराळे होण्याचा प्रयत्न करणे हे जनरल कौल, तुम्हाला शोभत नाही.

राजपूत आणि गुरखा जवान ता. २६ सप्टेंबरला लुंपूला आणले गेले. त्यांना पुढचे हुकूम देणे हे माझे काम होते, पण 'चिन्यांना हुसकून द्या!' हा एक हुकूम सोडला तर मला स्वत:लाच वरून निश्चित स्वरूपाचा दुसरा कुठलाही हुकूम मिळाला नव्हता; तर मी या नवीन आलेल्या जवानांना काय हुकूम देणार? का मी पण त्यांना असाच हुकूम द्यायला हवा होता, की 'जा पुढे आणि चिन्यांना हुसकून द्या?'

ज्या वेळी २/ राजपूत या तुकडीचे लेफ्टनंट कर्नल एम्. एस्. रीख यांनी मला विचारले की, "माझ्या तुकडीतल्या जवानांसाठी कुठली कामगिरी तुम्ही देणार आहात? काय आहे तुमच्या मनात?" त्या वेळी मी त्यांना सांगितले की, "नजीकच्या भविष्यकाळात तरी निश्चित अशी कुठलीच कामगिरी त्यांना नाही: G.O.C. स्वत:च शक्य तितक्या लवकर आघाडीवर येणार आहेत. त्यांच्याशी चर्चा करण्याच्या हेतूने मी प्रथम परिस्थितीचा अंदाज घेऊन माझी निश्चित मते तयार करतो आणि मग पुढे काय करायचे ते ठरवू."

१/९ गुरखाज आणि २/ राजपूत या दोन्ही तुकड्यांचे कमांडिंग ऑफिसर्स व्यक्तिश: माझे मित्र होते. ते माझ्याशी मनमोकळेपणाने बोलू शकत होते. अगदी लष्करी शिस्तीच्या बंधनांत राहून आणि मर्यादा सांभाळूनच त्यांनी बोलले पाहिजे असे त्यांचे माझे नाते राहिले नव्हते. त्यांच्या बोलण्यावरून माझ्या लक्षात आले की, ज्या घाईगर्दीच्या पद्धतीने आयत्या वेळी त्यांना पुढे जाण्यासाठी सांगण्यात

आले, ज्या पद्धतीने त्यांच्या तुकडीतल्या जवानांना हालचाली करणे भाग पाडण्यात आले, त्या पद्धतीबद्दल त्यांना तिटकारा आलेला आहे. काय हा किळसवाणा कारभार ! असे त्यांनी म्हणावे, अशी दुःखे त्यांनी भोगली होती. उगाच अर्धवट काहीतरी लिहून तुम्हाला अंधारात ठेवत नाही. २/ राजपूत ह्या तुकडीची हालचाल कशी केली गेली, ते पाहा, म्हणजे तुम्हाला त्या जवानांनी सोसलेल्या त्रासाची कल्पना येईल. नेफामधल्या लोहित फ्रॅंटियर डिव्हिजनवरील वॉलांग या ठिकाणी सतत तीन वर्षे कामगिरी बजावलेल्या या जवानांना मे, १९६२ मध्ये आसाममध्ये हलवण्यात आले. त्यानंतर ऑगस्ट, १९६२ मध्ये त्यांना उत्तर प्रदेश मध्ये नेण्यात आले. मधल्या वेळात त्यांना उघडचा मैदानात लढाई कशी करायची असते, याचे शिक्षण देण्यात आले. आणि नवीन कामगिरीवर पाठवण्यापूर्वी या बटालियनला असा हुकूम दिला गेला की, त्यांना दिले गेलेले वायरलेस सेट्स आणि इतर सर्व सामग्री त्यांच्या जागी येणाऱ्या ६ कुमाँट या तुकडीकडे त्यांनी सुपूर्द करावी. राजपूत जवानांना वॉलांगची चांगली माहिती होती. चीनबरोबर मोठ्या प्रमाणावर लढाई होण्याची शक्यता आहे या वीचारालाच आपण थारा देत नव्हतो. तसा विचार करून तयारीत असतो तर नोव्हेंबर, १९६२ मध्ये वॉलांगमध्ये पाठवण्यासाठी २/ राजपूत ही तुकडी राखून ठेवण्यात आली असती. तिथला प्रदेश कसा आहे, हे त्यांना कुणी सांगायची आवश्यकताच नव्हती.

ता. ९ सप्टेंबरला G. O. C. ने एम्. एस्. रीख यांना बोलावून घेऊन हुकूम दिला की, २/ राजपूत ही तुकडी ताबडतोब तावांगमध्ये घेऊन जा आणि ७ व्या पायदळ तुकडीला जाऊन मिळा. G. O. C. ने एम्. एस्. रीखना आश्वासन दिले होते की, २/ राजपूत या तुकडीला जर का काही अडचणी येत असतील तर त्या तुम्ही तावांगमध्ये पोचल्यानंतर दूर केल्या जातील.

२/ राजपूत ही तुकडी ता. १० सप्टेंबरला निघाली. सतत तीन दिवस प्रवास करून झाल्यानंतर त्यांना वाहन सोडून द्यावे लागले. कारण, पुढे रस्ता चांगला नव्हता. अवजड सामान स्वतःच उचलून हे जवान सेंजपासून पुढे चालत निघाले. तावांगमधल्या हवामानाची त्यांना सवय नव्हती. त्यामुळे हजारो फूट उंचीवरची सेला खिंड पार करीत असताना त्यांच्यापैकी पुष्कळांना रक्ताच्या उलटचा झाल्या, तर काहींना तापाने गाठले. तशातच वाटेत मुसळधार पाऊस सुरू झाला. थंड वारे वाहू लागले. अंगात गरम काही नाही. अंगावर फक्त साध्या कापडाचा हिरव्या रंगाचा गणवेष. तिथल्यातिथे बांधलेल्या ताडपत्र्यांच्या तंबूत ( म्हणजे जवळ जवळ उघड्यावरच ) या आजारी जवानांनी अनेक रात्री काढल्या तावांगमध्ये आल्यावर फक्त एक दिवस विश्रांती घेऊन ते लुंपूकडे जायला निघाले. आणि अखेर पंधरा दिवसांच्या या खडतर पदयात्रेनंतर ते ता. २४ सप्टेंबरला लुंपूला पोचले. आघाडीवर आले तेव्हा ते अतिशय थकलेले होते. त्यांना विश्रांतीची जरुर होती.

या अत्युत्कृष्ट बटालियनपुढे मी नतमस्तक झालो. त्यांचे श्रेय त्यांना द्यायलाच हवे. इतके हाल सोसून, इतक्या अडचणींना तोंड देऊन देखील ते उत्साही आणि आनंदी दिसत होते. त्यांच्यापैकी सुभेदार मेजरला मी सहज विचारले, " काय म्हणते तब्येत ? कसं काय वाटतं आता ? ठीक आहे ना ? " तावडतोब कुणालाही अभिमान वाटावा असे उत्तर त्याने दिले. तो म्हणाला. " साहेब ! फक्त एक दिवस थांबा. नंतर जी सांगाल ती कामगिरी पार पाडायला पलटण तयार आहे ! "

१ । ९ गुरखाज या तुकडीतल्या जवानांचा 'प्रवास' देखील २/ राजपूतमधल्या जवानांच्या प्रवासासारखाच झाला. आले तेव्हा दमलेले, लष्करी सरंजाम त्यांच्यापासून आधीच हिरावून घेतला गेलेला. आघाडीवर आले ते शस्त्रास्त्रांशिवाय. आल्याबरोबर लढाईसाठी पुढे पाठवण्याच्या अवस्थेत या दोन्ही तुकड्या नव्हत्या. त्यांच्याकडे नुसते पाहिल्याबरोबर मला ड्यूक ऑफ वेलिंग्टनचे शब्द आठवले. ते असे की " यांना पाहून शत्रूला काय वाटेल ते मला सांगता येणार नाही; पण देवा शपथ सांगतो, यांनी मला घाबरवून टाकलेले आहे ! "
(I do not know how they will impress the enemy, but by God, they frighten me ! ) आपल्या ७ व्या पायदळ तुकडीची स्थिती ही अशी होती. दिल्लीपतींना काही वचन देण्यापूर्वी वेळात वेळ काढून चीफने किंवा आर्मी कमांडरने जर का आघाडीवर येऊन पाहणी केली असती तर कदाचित 'जिंकू किंवा मरू' धर्तीचा निर्णय त्यांनी घेतला नसता.

एके दिवशी सकाळी मी एक अपूर्व दृश्य पाहिले. शांततेच्या काळात लष्करी छावणीत जवानांना शिक्षण द्यावे त्याप्रमाणे आघाडीवर नवीन आलेल्या २/ राजपूतमधल्या जवानांना शिक्षण दिले जात होते. मी कमांडिंग ऑफिसरला विचारले की, ' हे काय चाललंय ?' तेव्हा त्यांनी मला मासलेवाईक उत्तर दिले की, " ग्रेनेड " कशी फेकायची याचे प्राथमिक शिक्षण मी नवीन आलेल्या सैनिकांना देतोय ! " म्हणजे रेजिमेंटल सेंटरमध्ये त्यांना हे शिक्षण दिले गेले नव्हते. गेली कित्येक वर्षे भारतीय लष्करात ग्रेनेडस्‌चा तुटवडा होता आणि म्हणूनच जवानांना हे शिक्षण मिळालेले नव्हते. ग्रेनेड कशी फेकायची याचे प्राथमिक ज्ञान आघाडीवरच्या जवानांना नव्हते आणि हे जवान चिन्यांना हुसकून देणार होते !

ब्रिगेडिअर कल्याणसिंग, कमांडर आर्टिलरी 4th डिव्हिजन, यांनी तावांगच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली होती. सुरुवातीपासूनच प्रत्येकाला दोन घोड्यावर पाय ठेवायला सांगितले जात होते. ब्रिगेडिअर कल्याणसिंग तावांगचे संरक्षण करणार होते आणि थाग-ला विभागात चिन्यांचे आक्रमण पण थोपवून धरणार होते. त्याचा परिणाम असा झाला की, प्रत्येक ठिकाणी आपण दुबळे ठरलो. भारत सरकारच्या डोक्यात वैचारिक गोंधळ माजलेला होता. सप्टेंबर महिन्यात चिन्यांचा जोर वाढतो आहे हे पाहत असून आपण काहीही तयारी किंवा व्यवस्था केली नव्हती.

७ व्या पायदळ तुकडीची आणि तावांगमधल्या जवानांची रसद सर्वस्वी विमानांवर अवलंबून होती. लुंपू या ठिकाणी रसद व्यवस्थित मिळत होती. हळूहळू त्यामध्ये वाढ केली गेली आणि ३० सप्टेंबरपर्यंत दारूगोळा आणि २१ दिवसांचे अन्न मी पंजाबी जवानांना पुरवू शकलो. त्याशिवाय या जवानांच्या अंथरूण–पांघरुणाची, त्यांना लागणाऱ्या कुदळी, फावड्यांची व्यवस्था मी करू शकलो. मात्र सुरुंग लावण्याचा दारुगोळा आणि खबर पोचविण्याची तरतूद करू शकणाऱ्या तारांचे जाळे या त्यातल्यात्यात चैनीच्या व्यवस्था आपण करू शकलो नाही, की ज्या लढाईच्या वेळी ऐषआराम म्हणून नव्हे तर आवश्यक म्हणून लागतात. तरीदेखील पंजाब्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था आणि अवस्था खूपच सुधारली होती. चिन्यांकडून होत असलेल्या प्रत्येक गोळीबाराला ते चोख जबाब देत होते. दररोज होणाऱ्या या गोळागोळीत आपले जवान चांगलीच कामगिरी बजावीत होते. इतके की, चिनी सैनिकांनादेखील या भक्कम पंजाबी जवानांबद्दल आदर आणि आश्चर्य वाटले असेल. आणि म्हणूनच ता. २० ऑक्टोबर या दिवशी चिनी पंजाबी जवानांवर हल्ला करायला धजले नाहीत.

९/ पंजाब या तुकडीची तयारी अनंत अडचणींना तोंड देऊन होत होती. ता. २० सप्टेंबरला चिन्यांकडून पहिला गोळीबार झडल्यानंतर सरकारकडून दिले गेलेले हमाल सर्कीम (Serkhim) च्या पुढे वापरण्यात धोका होता. आघाडीवर सामान वाहून नेणारे हे हमाल फारसे कामाचे नव्हते. कारण त्यांचे स्वतःचे ४ दिवसांचे अन्न आणि फार फार तर १० पौंड वजनाचे सामान ते उचलू शकत होते. बरे, तिथलेच स्थानिक हमाल वापरावेत तर जवानांसाठी म्हणून पाठवलेले अन्न ते वाटेत स्वतःच खात असत. शेवटी अत्यंत निराशेने हा निर्णय घेण्यात आला की, जवानांचे सामान जवानांनी स्वतःच वाहून न्यावे. दोन घट्टेकट्टे शीख जवान एक जिवंत बोकड उचलून नेताहेत हे दृश्य पाहवत नसे. आजपर्यंत त्या डोंगराळ प्रदेशात जवानांसाठी साठे करून न ठेवण्यात जे दुर्लक्ष केले होते, त्याची फळे आपण भोगत होतो.

विमानातून-खाली टाकली गेलेली रसद गोळा करून आणण्याचे साधे काम राजपूत आणि गुरखा तुकडीचे २०० जवान दररोज करीत असत. शीख जवान बोकड अक्षरशः उचलून नेताहेत, हे दृश्य पाहून जनरल उमरावसिंग इतके वैतागले की धीटपणे ते उघडउघड सांगू लागले की, “काय हे? जवान जिवंत बोकड उचलून नेतात! ही काय जवानांच्या खाण्याची व्यवस्था आहे की मस्करी? कशाला उगाच चिन्यांना हुसकून देण्याची भाषा करता? नामका-चू नदीपर्यंत जवानांच्या खाण्यापिण्याची नीट सोय होईपर्यंत त्यांची तिथे जमवाजमव करण्यात अर्थ नाही.”

९/ पंजाब या तुकडीची खाण्यापिण्याची सोय करीत असतानाच एकीकडे २/

राजपूत आणि १।९ गुरखाज या तुकड्यातल्या जवानांसाठी शस्त्रास्त्रे, दारूगोळा, वायरलेस सेटस् आणि गरम कपडे पुरवण्याची तयारी करण्याचे प्रयत्न चालू होते. या प्राथमिक आणि आवश्यक वस्तूंशिवाय या तुकड्या लुंपू या ठिकाणी पाठवण्यात अर्थ नव्हता. या वस्तू रेल्वेने किंवा ट्रकने आणता आल्या असत्या. विमानातून खाली टाकलेले अन्न फक्त साठवून ठेवायचे असते. उतावळेपणा करून या तुकड्या आघाडीवर पाठवल्या गेल्या होत्या. आता दिल्लीत बसून कुणीतरी नकाशावर टाचणी रोवून सांगायला मोकळा होता की, " आपले इतके जवान या ठिकाणापर्यंत (टाचणी हलवून ' ठिकाण ' दाखवायचे.) गेले ! " पण ते लढू शकतील की नाही ? त्यांची व्यवस्था काय केली ? आपली ताकद खरोखर किती आहे, या फुग्यांना टाचणी लावायला कुणी तयार नव्हते ! फुटले असते ना ते सगळे फुगे !

मी हे एवढ्यासाठी सांगितले की, तुमच्या लक्षात यावे, की लढाईची तयारी दिल्लीतल्या सचिवालयाचा गॅलरीत होत नसते. लढाई मनात वाटेल ते विचार आणून लढता येत नसते. अदूरदर्शी आणि उधळ्या अपेक्षा बाळगून लढता येत नाही. राजकारण लष्करी अडचणींवर मात करू शकत नाही. हिमालय पर्वत हा हजारो वर्षांपूर्वी होता तसाच होता. तिथल्या अडचणी कायम होत्या. राजकारण त्या अडचणी ओलांडून जाऊ शकत नव्हते. लोकनियुक्त प्रतिनिधी हिमालय पर्वता-पुढे कितीतरी पटींनी बुटके होते.

देश वाचवण्यासाठी जवान किती धडपड करताहेत याचे चीज केले जात नव्हते. दिल्लीपती हेच समजून चालले होते, की आपल्या आघाडीवरच्या तुकड्या सुस्त आणि आळशी आहेत. नंतर जनरल प्रसादांकडून मला असे कळले की, जनरल सेन म्हणाले होते, " ७ वी पायदळ तुकडी जर का पुढे गेली नाही तर काय होणार ते दिसतेच आहे ! " वा ऽ रे वा ऽ ! ! योजना अमलात आणणारे गुन्हेगार आणि योजना आखणारे निर्दोष ! म्हणतात ना, ' लढनेकू तुम, और तुम्हारा कपडा सम्हालनेकू हम !' मला वाईट हे वाटते की जनरल सेनना आघाडीवर येऊन ७ व्या पायदळ तुकडीचे कष्ट पाहायला वेळ मिळाला नाही. ते आले असते तर कोण कुणा-साठी काय करतोय हे त्यांना कळले असते.

ता. २२ सप्टेंबर, १९६२ ला—ज्या दिवशी पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री ह्या दोन महत्त्वाच्या व्यक्ती परदेशी होत्या—संरक्षणमंत्री म्हणून तात्पुरते कामकाज पाहणारे (Officiating Defence Minister) श्री. रघुरामय्या यांनी थाग-ला या ठिकाणी घडलेल्या ' प्रकारा 'ची चर्चा करण्यासाठी लष्करी अधिकाऱ्यांची एक सभा घेतली. या सभेत आर्मी चीफ जनरल थापर यांनी असा अंदाज व्यक्त केला, की थाग-ला प्रदेशात चिन्यांची एक बटालियन आली असली पाहिजे. चिनी सैनिकांची एक कंपनी धोलाजवळ असावी. एक कंपनी धोलाच्या उत्तर-पूर्व दिशेला असेल आणि एक कंपनी थाग-ला खिडीत असावी. जनरल थापर यांनी पुढे स्पष्टपणे आग्रह धरून

सांगितले की, " धोला या ठिकाणी कुठल्याही क्षणी चिनी त्यांचे सैन्य वाढत्या संख्येने आणू शकतील. लडाखमधल्या आपल्या चौक्यांवर हल्ले करू शकतील आणि ते नाहीच जमले तर त्याचे उट्टे नेफामध्ये काढू शकतील." जनरल थापर यांनी इतका स्पष्ट सल्ला देऊन देखील आपल्या सरकारने असा निर्णय घेतला की, जनता खवळलेली आहे! आता चिन्यांना हुसकून देण्याचा निर्णय घेण्याशिवाय दुसरा मार्ग नाही!' त्यावर जनरल थापर म्हणाले की, " मग तसा लेखी हुकूम मला द्या! कारण जनतेला हे कळले पाहिजे की, माझा सल्ला धुडकावून देऊन भारत सरकारने चिन्यांना हुसकून देण्याबाबत उतावळेपणा करून माझ्या इच्छे-विरुद्ध तो हुकूम पाळणे मला भाग पाडले. जर का परिणाम भयंकर झाले तर त्याची जबाबदारी भारत सरकारवर पडेल. आर्मी-चीफ या नात्याने माझ्यावर नव्हे! "

हा अतिशय महत्त्वाचा लेखी हुकूम जॉइंट सेक्रेटरीने दिला. D. C. C. चे (Defence Committee of the Cabinet) तीन वरिष्ठ सभासद–पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि अर्थमंत्री–परदेशांत असताना दिला! त्यापूर्वी एक काम मात्र झाले होते. ट्रान्स अॅटलांटिक टेलिफोनवरून संरक्षणमंत्री श्री. कृष्णमेनन यांच्याशी बोलणी झाली होती. काय गंमत वाटली देशाचं संरक्षण म्हणजे? माझा विश्वास बसू शकत नाही की, अशा तऱ्हेने दिल्या गेलेल्या या लेखी हुकमावर आर्मी चीफचे समाधान झाले आणि त्यांनी तो हुकूम जनरल सेनना पाठवून त्यांना कळविले की 'चिन्यांना हुसकून द्या! तसा लेखी हुकूम मिळालाय.' आपण बरोबर असून देखील आपण धुडकावून दिले जाऊ शकतो, हे सहन करणाऱ्या आणि जबाबदारीच्या जागे-वर काम करणाऱ्या व्यक्तींना क्षमा होत नसते. मग तुम्हाला 'जबाबदार' असे कशाला म्हणायचे?

नंतर आघाडीवरच्या कोअर कमांडर्स आणि डिव्हिजनल कमांडर्सनी या हुकमा-बाबत निषेध व्यक्त केला. त्या वेळी त्यांनाही झिडकारण्यात आले आणि त्यांना बजावण्यात आले की, 'योजना तयार करा! चिन्यांना हुसकून द्या म्हणजे हुसकून द्या! या वेळेपर्यंत लष्करी क्षितिजावर जनरल सेन यांची घातकी आणि विषारी छाया पडली होती. आघाडीला त्यांनी स्वतः कधीच भेट दिली नाही. त्यांनी फक्त बिचाऱ्या जनरल उमरावच्या पाठीत सुरी खुपसली. त्यांना जनरल सेनने धारेवर धरले आणि प्रत्येकाला हुकूम देत सुटले की, 'जा. ताबडतोब पुढे जा! अजून तू मागे कसा?' आणि जेव्हा का सत्य परिस्थिती स्पष्टपणे उघड होऊ लागली, तेव्हा जनरल सेन पेचात पडले, की आता आर्मी चीफमार्फत भारत सरकारला सत्य वस्तु-स्थितीबाबत कशी कल्पना देऊ? 'चिन्यांना हुसकून देईन!' अशी वल्गना तर करून बसलोय. आता कटु सत्य कबूल करून मागे हटू?...ना घरका, ना घाटका!

'चिन्यांना हुसकून द्या!' हा हुकूम! भारत सरकार लवकरच G.O.C. मार्फत

माझ्यावर वजावणार होतं. 'नको ही ब्याद' असं मनातल्या मनात म्हणत वरचे अधिकारी माझ्यासारख्या ब्रिगेड कमांडरच्या गळ्यांत ती बांधणार होते आणि हा अजापुत्र तिथेच येऊन अडकणार होता. कारण, मी तो हुकूम कुणाच्या तरी गळ्यात मारून 'जा पुढे जा ऽ! आणि चिन्यांना हुसकून दे' असे म्हणू शकत नव्हतो. मी आघाडीवरचा कमांडर! हुकूम माझ्यापेक्षा खालच्या माणसावर ढकलून देता येत नव्हता. परिस्थिती अशी हास्यापद बनली होती की, पुढचा–मागचा विचार न करता 'खवळलेल्या' भारतीय जनतेला शांत करणे हे भारत सरकारचे मुख्य उद्दिष्ट (अमेरिकन लोकांच्या भाषेत प्रचार.) होते. आघाडीवरच्या ब्रिगेड कमांडरने लढाई कशी काय होणार आहे याचा विचार करायचा नव्हता. विचार करायचा होता, तो खवळलेल्या भारतीय जनतेला शांत कसे करू याचा! लोकशाही राष्ट्रातल्या लोकनियुक्त प्रतिनिधींच्या सर्वोच्च इच्छेचा किती विचित्र तमाशा होता हा! (ये क्या तमाशा है!) चिन्यांची लाट परतवून लावायचा निर्णय भारत सरकारने घेतला का? तर म्हणे खवळलेली भारतीय जनता किनाऱ्यावर उभी राहून भारत सरकारला ओरडून सांगत होती की, 'चिन्यांना हुसकून द्या!' ती जनता की, भारत सरकारने जिला अंधारात ठेवले होते! नुसती रस्त्यात धक्काबुक्की आणि आरडाओरडा करून मोठमोठी कामे होत नसतात. चिन्यांना हुसकून देण्याचा हुकूम फर्मावला गेला, तेव्हा आपल्या लष्कराची परिस्थिती ही अशी होती. कुठल्याही जबाबदार भारतीय लष्करी अधिकाऱ्याचा या हुकमाच्या अंमलबजावणीवर विश्वास आणि श्रद्धा नव्हती. प्रत्येकाला आतून हे पटले होते की, हा हुकूम चुकीचा आहे. उलट, चिन्यांना आपण कसे काय हुसकणार आहोत? आपल्याला ते जमेल का? याबद्दल जो तो साशंक होता. आणि हे काम कशा तऱ्हेने आपण करू शकतो याचे लष्करी दृष्ट्या समर्थन करणे हे माझ्या नशिबात आले होते.

(क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

१४ ते २० जून, १९६९

**मेष** : दि. १४ ला रात्री सूर्याचे मिथुन राशीत - राश्यंतर घडेल आणि त्याच क्षणापासून तुम्हाला जाणीव होऊ लागेल की, आता आपला अनिष्ट काल जवळ-जवळ संपला.

तुमची सारी स्थगित कार्ये गती घेऊ लागतील. न होणारी कामे झटपट निकालात निघू लागतील. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील.

साडेसातीसारखा अनिष्ट समजला जाणारा कालही कित्येक वेळा अपेक्षेबाहेर प्रगतीचा ठरतो, याचाही अनुभव येथून पुढे यायला लागेल.

बदली-बढतीचे योग येतील. दूरचे प्रवास करणे शक्य होईल. नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील. सांपत्तिक योगही सुधारण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. १६–१८–२० हे दिवस यशदायी ठरावेत.

**वृषभ** : बुधाचे तुमच्या राशीतील अस्तित्व तुम्हाला प्रत्येक कार्यात यशदायी ठरावे. मंगळाच्या विरोधाची पर्वा न करता वेगाने पुढे निघालात तर यश हस्तगत व्हायला फारसा वेळ लागणार नाही.

सांपत्तिक ताण कमी होईल. इष्टमित्रांचा विरोध मावळेल. नोकरीधंद्यातील समस्या सुटण्याची लक्षणे दिसू लागतील.

साडेसातीबद्दल सध्या तरी आपणास विचार करण्याचे कारण नाही. एवढे मात्र खरे की, कोणतीही गोष्ट करताना परिश्रम खूप करावे लागतील.

अनपेक्षित लाभाला हे दिवस फारसे अनुकूल नाहीत. अवास्तव खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. १७ ते २० अनुकूल दिवस.

**मिथुन :** या आठवड्यापासूनच मंगळाचे हृदयपरिवर्तन झाल्याची जाणीव व्हायला लागेल आणि त्यामुळेच तुमच्या व्यथा, विवंचना बऱ्याच कमी झाल्याचा प्रत्यय यायला लागेल. अनारोग्य, व्यावसायिक मंदी, विरोधकांची कारस्थाने या सर्वांना आळा बसेल. यापुढे तुमचे प्रगतीचे मार्ग सहसा रोखले जाणार नाहीत.

व्यवसायधंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरल्याचा प्रत्यय यायला लागेल. नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. व्यवसायधंद्याची घसरलेली गाडी पुन्हा मार्गावर आणण्यात यशस्वी व्हाल. पण धावपळ, धडपड काही चुकणार नाही.

स्थानांतर-स्थित्यंतरांचे योग स्पष्टपणे दिसू लागतील.

दि. १९–२० पासून उत्साही वातावरण दिसू लागेल.

**कर्क :** गेल्या कित्येक दिवसांपासून तुमची प्रगतीकडे वाटचाल सुरूच आहे. या आठवड्यापासून तिची गती वाढीस लागेल.

गुरु-मंगळांच्या अनुकूलतेमुळे कर्तृत्वाला धार चढेल. व्यवसायधंद्याचा व्याप, विस्तार वाढेल. कोणत्याही कार्यात अपेक्षेबाहेर यश लाभेल.

बदली-बढतीचे योग दिसू लागतील. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. स्थावरासंबंधीच्या योजना आकार घेऊ लागतील. इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

शेती, खते, रासायनिक द्रव्ये या व्यवसायांशी आपला संबंध असेल तर त्यात चांगलीच प्रगती होईल.

दि. १६ ते २० अनुकूल काल.

**सिंह :** सूर्य हेच तुमचे आराध्य दैवत. तेच मुळी लाभस्थानी प्रकटलेले. शिवाय गुरु-शुक्रही हवे तसे आलेले. इतका सर्वांगाने चांगला काल या वर्षातील हाच पहिला.

प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागतील. उद्योगधंद्याचे क्षेत्र विस्तारेल. इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. अनपेक्षित स्वरूपाचा धनलाभही होणे शक्य.

यांत्रिक–संशोधन क्षेत्रातील व्यक्तींना तर हा एक महान पर्वकाल आहे असे वाटायला लागेल. अनेक संधी पुढे येतील. त्यांची दखल घ्यावी असाच हा अनुकूल काल आहे.

दि. १५ ते १७ हा सर्वोत्तम प्रगतीचा काल.

**कन्या :** अंतरिक्षातील अनेक ग्रहांची कृपा लाभल्याने आता तुम्हांला कुठेही माघार घेण्याचा प्रसंगच उद्भवणार नाही. फारसा प्रयत्न न करताही घवघवीत यश पदरी पडू शकेल.

नव्या क्षेत्राशी संबंध येईल आणि त्या क्षेत्रात अनन्यसाधारण यश पदरी पाडून घेता येईल.

या आठवड्यातील गुरू-बुधाचा त्रिकोण तुम्हाला अपेक्षासाफल्याचा ठरेल. साहित्याच्या, कलेच्या प्रांतात उच्च स्थान मिळवाल. शिक्षण, अर्थशास्त्र याबाबतीतही तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल.

दि. १७ ते २० या कालाची नोंद घ्या.

**तूळ :** सूर्य भाग्यस्थानी येत आहे, आल्यासारखाच आहे. आता तुम्हाला शनि-मंगळाचा विरोध सहसा होऊ शकणार नाही. आजवर केलेल्या परिश्रमाचे श्रेय येथूनच आपल्या पदरी पडावे.

दूरच्या प्रवासाचे निश्चित ठरेल, तुम्हापैकी कित्येकांना परदेशास जाण्याचीही संधी लाभेल.

चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींना तर सहसा कोणत्याही गोष्टीबद्दल चिंता करण्याचा प्रसंग उद्‌भवणार नाही. नव्या उद्योगधंद्याचे विचार आकार घेऊ लागतील, व्यापार-धंद्यांतही थोडेफार पुढे पाऊल पडू शकेल.

दि. १५ ते १८ खूपच घाईगर्दीचे दिवस जाणवतील.

**वृश्चिक :** अन्य ग्रहांचे फारसे सहकार्य लाभू शकत नसले तरी, एकटा गुरू तुम्हाला हवं ते द्यायला समर्थ आहे. आपल्या व्यावसायिक व सांपत्तिक अपेक्षा अपेक्षेबाहेर सफल व्हाव्यात असाच हा महत्त्वाचा काल आहे. आगामी ३–४ महिन्यांत चिरंतन स्मृतीच्या अनेक घटना घडतील.

नवे स्नेहसंबंध जुळून येतील, सर्व कार्यात थोरांचे सहकार्य लाभेल, राजकीय क्षेत्रातील आघाडीचे स्थान लाभेल. नव्या व्यवसायाचे क्षेत्र हस्तगत होईल. शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक पाऊल पुढे पडेल. शेती, स्थावर, वाहन याबाबतीतही आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यांत.

दि १७ ते २० या कालावर लक्ष केंद्रित करा.

**धनू :** चौथ्या राहूची डोकेदुखी लवकरच कमी होईल अशी आशा करायला जागा आहे. मंगळाची अनिष्टताही हळूहळू ओसरू लागलेली आहे.

या आठवड्यात प्रत्यक्षात काही महत्त्वाचे असे घडले नाही तरी, आगामी काली काही भव्य दिव्य घडून येण्याची लक्षणे मात्र याच काली दिसू लागतील.

अवास्तव खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

स्थावर वाहन या बाबतीत अपेक्षेप्रमाणे घडून येण्याची लक्षणेही दिसू लागतील.

नोकरीधंद्यातील हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील.

वादविवाद–मतभेद यावर काही तोडगा सापडू शकेल.

दि. १६ ते १८ काहीसा अनुकूल काल.

**मकर :** या वेळची आपली ग्रहस्थिती निश्चितच अनुकूल आहे. पण या अनुकूलतेचा अर्थ अफाट धनलाभच होईल असा करू नका. न मिळालेले स्वास्थ्य लाभेल, व्यवसायधंद्याचे नवे तंत्र फलदायी ठरेल, इष्टमित्रांचे हार्दिक सहकार्य

कोणत्याही क्षणी लाभेल.

पैशापेक्षा प्रतिष्ठा अधिक लाभेल आणि नोकरीधंद्यातील यशापेक्षा उत्तम आरोग्याचा लाभ घडेल. ग्रहांच्या इष्टानिष्टतेचा असा अर्थ लावलात तरच अनुकूल ग्रहस्थितीच्या कार्याची आपणाला खरी कल्पना येऊ शकेल. पैसा म्हणजेच सर्व काही असा समज करून घेऊ नका.

दि. १८ ते २० या कालात अनेक चांगल्या घटना घडाव्यात.

**कुंभ :** सूर्य मिथुनेत आल्यामुळे आता आपली रेंगाळलेली कामे भराभर यशस्वी ठरू लागतील. दूरदेशी प्रयाण घडेल. नव्या वातावरणात लवकरच समरस व्हाल. नवे स्नेहसंबंध जोडले जातील.

सांपत्तिक दृष्ट्या हा काल फारसा अनुकूल नसला तरी तुमचे सहसा कुठेच नडणार नाही. नव्या जबाबदाऱ्या वाढू लागतील, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करण्याची संधी लाभेल, वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल.

स्थावराचा प्रश्न झटपट सुटेल, इष्टमित्र कोणत्याही क्षणी साहाय्यास धावून येतील.

आजवरचे आपले अपुरे स्वप्न याचवेळी आकार घेऊ लागेल.

दि. १५ ते १८ हा काळ विशेष महत्त्वाचा.

**मीन :** भाग्यस्थ मंगळाने आजवर आपणास भरपूर साहाय्य केले. आता तो अधिक कार्यक्षम झाल्याचा प्रयत्य येऊ लागेल. साऱ्या स्थगित कार्यांना तो गती देऊ लागेल. हुकलेल्या संधी पुन्हा पुढे आणून उभ्या करील.

साहित्य-कला-नाट्य क्षेत्रातील व्यक्तींना तर याच्याइतका सर्वांगाने चांगला काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. मंगल कार्याचे निश्चित केले जाईल. राजकीय, सामाजिक क्षेत्रांत आघाडीवर राहण्याची संधी लाभेल.

सांपत्तिक लाभालाही हा काळ अनुकूल जाणवेल.

दि. १७ ते २० या कालावर लक्ष केंद्रित करा. ■■

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




" नशीबवान आहे लेकाचा ! नापास झाल्यामुळे एक वर्ष तरी बेकारीच्या तडाख्यातून वाचलाय्–उगाच नाही एवढा आनंद झालाय् त्याला..."